POSTAL REGISTRATION : PLG/255/2023-2025

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

# मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष -०४ ● अंक-२७७ ● मुंबई, शुक्रवार, ०९ मे २०२५ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

### महत्त्वाच्या पर्यटन स्थळांची, आध्यात्मिक स्थळांची सुरक्षा व्यवस्थेत वाढ

# 'ऑपरेशन सिंदूर'नंतर राज्यात अलर्ट




**■मुंबई।प्रतिनिधी :**

जम्मू-काश्मीर मधील पहलगाममध्ये झालेल्या भ्याड दहशतवादी हल्ल्यात निष्पाप २६ जणांचा दुदैवी मृत्यू झाला. या घटनेनंतर देशासह जगभरात संतापाची लाट परसाली होती. परिणामी या भ्याड हल्याला जशाच तसं उत्तर देत भारताने १५ दिवसानंतर बदला घेत पाकड्यांना अद्दल घडवली आहे. भारताने 'ऑपरेशन सिंदूर'च्या माध्यमातून पाकिस्तानच्या ९ दहशतवादी तळांवर एअर स्ट्राइक करत पहलगामच्या भ्याड हल्ल्याला चोख प्रत्युत्तर देत बदला घेतलाय. या घटनेने पाकिस्तान पुरता घाबरल्याचे दिसून येत आहे. शिवाय पाकिस्तानकडून सीमारेषेवर वारंवार गोळीबार करण्यात येत आहे. अशातच पाकिस्ताननं परत एकदा आपला खरा चेहरा समोर करत अमृतसरजवळच्या जेठुवाल गावात पाकिस्तानी रॉकेट पाडण्यात आलं आहे. तर दुसरीकडे महाराष्ट्रासह देशातील अनेक भागात सुरक्षा व्यवस्थेत वाढ करण्यात आली आहे.

**'ऑपरेशन सिंदूर'नंतर महाराष्ट्रभरात अलर्ट**

पाकिस्तानमधील हवाई हल्ल्यानंतर महाराष्ट्रात अलर्ट जारी करण्यात आला आहे. महाराष्ट्रातील महत्त्वाच्या पर्यटन स्थळांची, आध्यात्मिक स्थळांची सुरक्षा वाढवण्यात आली आहे. त्या सर्व ठिकाणी अधिक दक्षता ठेवण्याच्या सूचना पोलिसांना देण्यात आल्या. संभाव्य परिस्थिती लक्ष्यात घेता सर्वत्र खबरदारी घेण्यात येत आहे. अशातच परराष्ट्र मंत्रालयाकडून आलेल्या आकडेवारीनुसार, पाकिस्तानने 'लोक'वर केलेल्या शस्त्रसंधी उल्लंघनात एकूण १३ भारतीय नागरिकांचा मृत्यू झाला आहे, तर ५९ नागरिक जखमी झाले आहेत. मृतांमधील सर्व पुंछमधील असल्याची माहिती पुढे आली आहे. तर एकूण जखमीपैकी ४४ पुंछमधील असल्याची माहिती आहे.

**ऑपरेशन सिंदूर २.०**

परराष्ट्र सचिव विक्रम मिश्री यांची दिल्लीत पत्रकार परिषद सुरु झाली. भारतावर पाकिस्तानने काल रात्री आणि आज सकाळी उत्तर आणि पश्चिम भागात अनेक लष्करी ठिकाणांना लक्ष्य केले – परराष्ट्र मंत्रालय. या हल्ल्यांना प्रत्युत्तर म्हणून भारताने एकात्मिक वअर (ड्रोन) ग्रिडद्वारे पाकिस्तानच्या हल्ल्यांचे प्रयत्न निष्फळ केले. हल्ल्यांचे अवशेष अनेक ठिकाणी सापडले असून ते हल्ल्याचा पुरावा आहेत. लाहोरसह अनेक ठिकाणी पाकिस्तानचे एअर डिफेन्स रडार आणि प्रणाली भारताने उद्धवस्त केल्यानियंत्रण रेषेवर (छङ्गउ) पाकिस्तानकडून बिनधास्त आणि उद्दाम गोळीबार सुरू होता, तर 16 निष्पाप नागरिकांचा यात मृत्यू झाला. भारताकडून पाकिस्तानला जोरदार प्रत्युत्तर, मोर्टार आणि तोफांची जोरदार गोळीबार झाला. यात लेफ्टनंट कर्नल सोफिया कुरेशी यांनी सांगितलं की पाकिस्तानकडून ड्रोननं हल्ला करण्याचा प्रयत्न झाला. त्यांनी भारतातील अनेक शहरांवर हल्ला करण्याचा प्रयत्न झाला. पाकिस्तानकडून सीमारेषेवर गोळीबार करण्यात आला. तर पाकिस्तानचा हल्ला हा भारताकडून परतावून लावण्यात आला आहे.

**भारत–पाक सीमारेषेजवळील राज्यांमध्ये मॉकड्रील**

भारत आणि पाकिस्तान यांच्यात युद्ध झाले तर सर्वाधिक नुकसान हे साहजिकच नियंत्रण रेषेला लागून असलेल्या परिसरात होईल. त्यामुळे भारत-पाक सीमारेषेपासून जवळ असलेल्या राज्यांमध्ये मॉकड्रील सुरु झाली आहे. या राज्यांमधील लोकांना हवाई हल्ल्यापासून वाचण्यासाठी प्रशिक्षण दिले जात आहे. भारतात सीमारेषेपासून जवळ असलेल्या राज्यांचा विचार करायला झाल्यास त्यामध्ये पंजाब, जम्मू-काश्मीर, गुजरात आणि राजस्थान यांचा समावेश आहे.

**भारतीय वायूदलाला सरकारची सूट**

पाकिस्तानी लष्कराकडून बुधवारी रात्री अमृतसर येथील जेठुवाल गावात रॉकेट डागण्यात आले होते. मात्र, हे रॉकेट भारतीय सैन्याने अमृतसर-पाकिस्तान सीमारेषेजवळील शेतात पाडले. भारतीय सैन्याने हे क्षेपणास्त्र ताब्यात घेतले आहे. या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने भारतीय वायूदलाला पूर्ण मोकळीक दिली आहे. पाकिस्तानने आगळीक केल्यास तोडीस तोड प्रत्युत्तर द्या. पाकिस्तानी विमानं भारताच्या हवाई हद्दीत दिसली तर कारवाई करण्याची सूट भारतीय हवाई दलाला देण्यात आली आहे.

# मुंबईकरांचा प्रवास महागला!

## आजपासून बेस्ट बसच्या दरात दुप्पट वाढ

- **प्रवास भाडेटप्प्यात बदल :** विद्यमान भाडेसारणीमध्ये ५, १०, १५ व २० कि.मी. अंतरावर भाडेटप्पा देण्यात आले होते. तथापी प्रस्तावित भाडेतक्त्यामध्ये ५, १०, १५, २०, २५, ३०, ३५, ४०, ४५ व ५० कि.मी. व त्यानंतर प्रत्येक 5 कि.मी. अंतरावर भाडेटप्पा देण्यात आलेले आहेत.
- **विना वातानुकूलित बससेवा :** ५ कि.मी. अंतरापर्यतचे किमान प्रवासभाडे ५ रुपयावरुन १० रुपये करण्यात आले आहे.
- **वातानुकूलित बससेवा :** ५ कि.मी. अंतरापर्यंतचे किमान प्रवासभाडे ६ रुपयावरुन १२ रुपये करण्यात आले आहे.
- **सवलतीचे प्रवास भाडे :** विद्यमान प्रवासभाड्यात १२ वर्षे वयापर्यतच्या मुलांना सवलतीच्या प्रवासभाड्याची तरतूद उपलब्ध नाही. परंतू, नवीन सुसूत्रीकरणादरम्यान ५ ते १२ वर्षे वयापर्यतच्या मुलांना प्रवासभाड्यात सवलतीची तरतूद करण्यात आली आहे.
- **दैनंदिन / मासिक बसपास :** या दैनदिन / मासिक बसपासच्या सहाय्याने प्रवासी मुंबई शहर, उपनगरे तसेच बेस्ट उपक्रमाचे बसप्रवर्तन कार्यरत असलेल्या संपूर्ण प्रवर्तन क्षेत्रामध्ये अमर्याद प्रवास करु शकतील. दैनंदिन बसपासचे शुल्क रु.६०/- वरून रु.७५/- करण्यात आलेले आहे. व मासिक शुल्क रु.९००/- वरुन रु.१८००/- करण्यात आलेले आहे.
- **शालेय विद्यार्थ्यांकरीता बसपास :** उपक्रमाच्या बससेवांवर खासगी शैक्षणिक संस्था, महाविद्यालय, विद्यापीठ यामधून शिक्षण घेणाऱ्या वयोमयार्दा २६ वषार्खालील विद्यार्थ्यांना विद्यमान सवलतीच्या दरात बसपास उपलब्ध करुन देण्यात येत आहेत. या बसपासच्या मुल्यामध्ये कोणताही बदल करण्यात आलेला नाही.
- **महापालिका शाळेतील गणवेषधारक विद्यार्थी :** महापालिका शाळेतील विद्यार्थ्यांना उपक्रमाच्या बसगाड्यांमधून मोफत प्रवासाची सुविधा विद्यमान पध्दतीने उलअछड स्मार्टकार्डच्या सहाय्याने देण्यात येणार आहे.
- **ठराविक अंतराचे बसपास :** प्रवासी त्यांनी निश्चित केलेल्या अंतरादरम्यान ठराविक बसफेऱ्यांसाठी साप्ताहिक आणि मासिक पासचा वापर करुन प्रवास करू शकतात.



**■मुंबई।प्रतिनिधी :**

मुंबईकरांसाठी मोठी आणि महत्वाची बातमी समोर आली आहे. मुंबईकरांचा बस प्रवास आता महाग होणार आहे. बेस्ट बसच्या प्रवासभाड्यामध्ये दुप्पट वाढ करण्यात आली आहे. ही भाडेवाढ आजपासून (९ मे २०२५) पासून लागू करण्यात येणार आहे. दरम्यान या भाडेवाढीचा फटका सर्वसामान्य मुंबईकरांना बसणार आहे.

**बेस्टच्या आर्थिक डबघाईवर तोडगा काढण्यासाठी ही भाडेवाढ**

बेस्टच्या आर्थिक डबघाईवर तोडगा काढण्यासाठी ही भाडेवाढ करण्यात आली असल्याची माहिती आहे. त्यामुळे अगोदरच वाढत्या महागाईने वैतागलेल्या मुंबईकरांच्या खिशावर आणखी भार पडणार आहे. अनेक सामान्य नागरिक रिक्षा, टॅक्सी अशा खासगी वाहनांऐवजी माफक दरात वाहतूक सेवा पुरवणाऱ्या बेस्ट बसला पसंती देतात. मुंबई आणि उपनगरातील अनेक भागांमध्ये बेस्ट बसला शेअर टॅक्सी आणि शेअर ऑटो रिक्षाचा पर्याय आहे. मात्र, शेअर रिक्षा आणि टॅक्सीचे भाडेही मुंबईतील अनेक गरीब वर्गाला परवडत नाही. त्यामुळे हे लोक तासनतास बसच्या रांगेत उभे राहून प्रवास करतात. मात्र, आता बेस्ट बसच्या तिकीटाच्या दरात दुप्पटीने वाढ झाल्याने सर्वसामान्य वगार्ला मोठा फटका बसणार आहे.

## गेला उन्हाळा आला पावसाळा?



**■मुंबई।प्रतिनिधी :**

अरबी समुद्रापासून थेट मध्य प्रदेशापर्यंत कमी दाबाचा पट्टा तयार झाला असून, दुसरीकडे तामिळनाडूनपासून थेट मनारच्या आखातापर्यंतही अशीच स्थिती निर्माण झाली आहे. ज्यामुळं महाराष्ट्रातील बहुतांश भागांमध्ये पावसासाठी पूरक वातावरणनिर्मिती होताना दिसत आहे. एप्रिल महिन्यातील वाढलेल्या उकाड्यातूनही बाष्पीभवन प्रक्रियेला वेग आला असून, त्यातूनच राज्यात पावसाच्या सरींची जोरदार बरसात होत असल्याचं पाहायला मिळालं. हवामान विभागानं हे एकंदर चित्र पाहून वर्तवलेल्या प्राथमिक अंदाजानुसार पुढील २४ तासांमध्ये या परिस्थितीत फारशी सुधारणा होणार नसून राज्यात सर्वत्र ढगाळ वातावरण पाहायला मिळेल. काही भागांमध्ये ऊन सावलीचा खेळही पाहायला मिळेल. राज्याच्या मध्य महाराष्ट्र भागासह कोकण, मराठवाडा आणि विदर्भाला हवामान विभागानं वादळी पावसाच्या धर्तीवर यलो अलर्ट दिला आहे. एकंदरच ढगाळ वातावरण, पावसाची हजेरी यामुळं बहुतांश भागांमध्ये तापमानाच घट झाली असून, हा आकडा ४० अंशांहूनही कमी झाल्याचं स्पष्ट होत आहे. गुरुवारीही राज्यात कोकण किनारपट्टीला लागून असणाऱ्या मुंबईसह ठाणे, पालघर आणि रायगड जिल्ह्यात सतर्कतेचा इशारा प्रादेशिक हवामान विभागाने दिला आहे. यावेळी काही ठिकाणी जोरदार वाऱ्यांसह पावसाचाही अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. काही भागात जोरदार सरींची शक्यता अशा वेळी नागरिकांनी आवश्यक ती काळजी घ्यावी, असा सल्ला यंत्रणांनी दिला आहे. कोकण आणि विदभार्तील काही जिल्ह्यांचा दक्षतेचा इशारा देण्यात आला असून, या भागांमध्ये वाऱ्याचा वेग वाढण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. पश्चिम महाराष्ट्र प्रामुख्यानं अंशतः ढगाळ राहण्याची शक्यता असून काही भागात हलक्या सरींची बरसात अपेक्षित आहे.

### सप्टेंबरआधीच होणार पालिकेच्या निवडणुका

# सुप्रीम कोर्टाचे राज्य सरकारला निर्देश

**■मुंबई।प्रतिनिधी :**




स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसंदर्भात महत्वाची अपडेट समोर आली आहे. त्यामुळे या प्रलंबित निवडणूका ४ महिन्याच्या आत होण्याची शक्यता आहे. सुप्रीम कोटार्ने राज्य सरकारला यासंदर्भात निर्देश दिले आहेत. स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुक ठराविक वेळेत घ्या, असे सुप्रिम कोटार्ने आपल्या आदेशात म्हटलंय. उर्वरित वादाचे मुद्दे टाळण्याचे कोटार्चे निर्देश आहेत.

महाराष्ट्रात लवकरच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होणार आहेत. २०२२ पूर्वीच्या आरक्षणाबाबतचा कायदा लागू होईल. निवडणुका कालबद्ध पद्धतीने घ्याव्यात. मोठ्या संख्येने स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांमध्ये जाणार असल्याने आवश्यकता भासल्यास मुदतवाढ मागता येईल, असेही निदेर्शात म्हटलंय. महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोगाला ४ आठवड्यांच्या आत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची अधिसूचना देण्याचे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत. २०२२च्या अहवालापूर्वी राज्यात अस्तित्वात असलेल्या ओबीसी समुदायांना आरक्षण देण्यात यावे, असेही यात म्हटलंय.

# महाराष्ट्राच्या राजकारणात पुन्हा भाकरी फिरणार?

## शरद पवारांच्या 'त्या' वक्तव्यानंतर पुन्हा राजकीय भूकंपाची शक्यता



**शरद पवार काय म्हणाले?**

आमच्या पक्षांतर्गत दोन मतप्रवाह आहेत. एका गटाला वाटतं की आम्ही एकत्र यावं. अजित पवारांसोबत जावं असं एका गटाला वाटतं. एका गटाला वाटतं की भाजपसोबत जाऊ नये. इंडिया आघाडी सध्या सक्रीय नाही. विरोधी पक्षात बसायची की नाहे हे सुप्रिया सुळेंनी ठरवावं, असं शरद पवारांनी म्हटलं आहे.


**■मुंबई।प्रतिनिधी :**

गेल्या काही दिवसांपासून ठाकरे बंधू एकत्र येणार अशा चर्चा सुरु आहेत. अशातच आता राष्ट्रवादीत सध्या विलीनीकरणाचे वारे सुरु आहेत का? असा सवाल सध्या चर्चेत आला आहे. राष्ट्रवादी पक्षातील एक गट अजित पवारांसोबत जाणार का अशा चर्चा सुरु झाल्यात. याला निमित्त ठरलंय शरद पवारांनी केलेले मोठं वक्तव्य. इंग्रजी दैनिकाला दिलेल्या मुलाखतीत शरद पवारांनी हे वक्तव्य केले आहे.

आमच्या पक्षातील एका गटाला अजित पवारांसोबत जावं वाटतंय असं वक्तव्य शरद पवारांनी केलंय. एका इंग्रजी दैनिकाला दिलेल्या मुलाखतीत शरद पवारांनी याबाबत माहिती दिलीय. इंडिया आघाडीच्या सद्य स्थितीवरही पवारांनी भाष्य केलंय. तसंच संसदेत विरोधी पक्षात बसायचं की नाही हे सुप्रिया सुळे यांनी ठरवावं असं सूचक वक्तव्य पवारांनी या मुलाखतीत केलंय. पवारांच्या या वक्तव्यांमुळे राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये विलीनीकरणाचे वारे सुरु झालेत का अशा चर्चा रंगल्यात.

विधानसभा निवडणुकांच्या निकालानंतर शरद पवाराच्या पक्षात दोन मतप्रवाह निवडून आलेल्या आमदारांमध्ये पाहायला मिळत होते. अनेक आमदारांनी अजित पवारांसोबत जाण्याची इच्छा व्यक्त केली होती. पण यासंदर्भात माध्यमांसमोर कोणीही वक्तव्य केले नव्हते. मात्र आता पक्षाचे सर्वेसर्वा शरद पवार यांनीच या संदर्भात मोठं भाष्य केले आहे. अजित पवारांसोबत जाण्यासंदर्भात त्यांनी प्रतिक्रिया दिलेली आहे. पक्षातील काही आमदार मतदारसंघातील प्रश्न घेऊन अजित पावरांची भेट घेत असतात. तर काही आमदार प्रसारमाध्यमांवर अजित पवारांवर टीका करताना दिसून येतात. त्यामुळं या चर्चांना पुन्हा एकदा उधाण आलं आहे.

अनेक दिवसांपासून दोन्ही पवार एकत्र येणार का असा सवाल उपस्थित केला जात होता. त्याला कारणही तसंच होतं. अनेक कार्यक्रमात दोन्ही पवार एकत्र आल्याचे पाहायला मिळाले होते. शरद पवार आणि अजित पवार हे वेगवेगळ्या साखर कारखान्यांच्या बैठकांना उपस्थित होते. काही वेळाला त्यांच्यात गुप्त बैठकादेखील झाल्या होत्या. तेव्हा त्यांना हा प्रश्न विचारण्यात देखील आला होता. मात्र आता स्वतः शरद पवारांनीच यावर भाष्य केले आहे. त्यामुळं राजकारणात पुन्हा काही मोठं घडणार का याची शक्यता वर्तवण्यात येतेय. शरद पवार पुन्हा भाकरी फिरवणार का? अशी चर्चा सध्या सुरू आहे.



# आजीच्या प्रथम स्मृतिदिनानिमित्त रक्तदान-प्लेटलेट्स दानातून सामाजिक बांधिलकी जोपासून श्रद्धांजली अर्पण

### लेफ्ट. व सहा.प्रा.संदीप बाळासाहेब भिसे, सहसचिव सांस्कृतिक विभाग आश्रय सामाजिक सांस्कृतिक शैक्षणिक ट्रस्ट ठाणे



रक्तदान करताना लेफ्ट.व सहा. प्रा. संदीप बाळासाहेब भिसे



प्लेटलेट्स दान करताना देवल किसन डोंगरे



रक्तदान करताना माणिक किसन डोंगरे (नारायणगाव,जुन्नर)



रक्तदान करताना कुणाल पाटील (अंधेरी, मुंबई)



रक्तदान करताना प्रमोद दत्तात्रय भोरे (घाटकोपर, मुंबई)

**■मुंबई।प्रतिनिधी :**

आमच्या आजी कै.शांताबाई गहिनाजी डोंगरे, या वयाच्या ८५ व्या वर्षी १५ मे २०२४ रोजी स्वर्गवासी झाल्या. आम्हाला दिलेली शिकवण, समाजाप्रती आपले असणारे देणे, याचा संस्कार आमच्या बालमनावर तिने केव्हाच कोरला होता. तिचे प्रथम पुण्यस्मरण दि. ०५ मे २०२५ रोजी होते. आम्ही नातवंडांनी एका वेगळ्या पद्धतीने सामाजिक ऋणातून मुक्त होण्यासाठी या दिवशी रक्तदान व प्लेटलेट दान करण्यातून वर्ष श्राध्द साजरे केले. समाजात अनेक रुग्ण असे आहेत, ज्यांचे उपचार केवळ उपलब्ध होणाऱ्या रक्तातूनच केले जातात. हे रक्त केवळ मानवी शरीरातच निर्माण होते. म्हणून रक्तदानातून सामाजिक बांधिलकी जोपासण्याचे आम्ही ठरवले. मानवी शरीर हाच रक्त निर्मितीचे केंद्रस्थान आहे. शरीरात रक्त निर्माण होण्यासाठी शरीर सुदृढ, निरोगी व आवश्यक रक्तातील घटक योग्य प्रमाणात असणे गरजेचे आहे. त्याद्वारे आपण रक्तदान अथवा प्लेटलेट दान करू शकतो. यातून रुग्णांच्या आजारावर उपचार होतात. एक प्रकारे त्यांना जीवनदान मिळते.

गुरुवर्य मामासाहेब दांडेकर कला, भगवंतराव वाजे वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय सिन्नर येथे मी एक सहाय्यक प्राध्यापक आहे. महाविद्यालयातील राष्ट्रीय छात्र सेनेच्या माध्यमातून व कर्मवीर डॉ. वसंतराव पवार वैद्यकीय महाविद्यालय व संशोधन केंद्र आडगाव, नाशिक यांच्या म.वि.प्र.रक्तपेढीमार्फत महाविद्यालयात रक्तदानाची शिबिरे आयोजित केली जातात. या रक्तदानात महाविद्यालयीन युवक-युवती, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व पालक सहभागी होऊन सामाजिक बांधिलकी या कायार्तून जपतात.

५ मे २०२५ रोजी मी आश्रय सामाजिक सांस्कृतिक शैक्षणिक ट्रस्ट ठाणे या संस्थेचा सांस्कृतिक विभाग सहसचिव या नात्याने राष्ट्रीय स्वयंसेवक संघ संचलित जनकल्याण रक्तपेढी नाशिक, गंगापूर रोड येथील केंद्रात जाऊन रक्तदान केले. माझ्यासोबत देवल किसन डोंगरे याने प्लेटलेट्स दान केल्या.

आजीची इतरही नातवंडे वर्षभर वेगवेगळ्या रक्तदान शिबिरांमध्ये सहभागी होतात व रक्तदान करतात. आजीच्या या प्रथम स्मृतीदिनी आम्हाला सर्व समाजातील युवक-युवती तसेच सर्वसामान्यांना हाच संदेश देता येईल की, आपण समाजाप्रती रक्तदानाच्या माध्यमातून रक्ताचे नाते जोपासावे.ऑपरेशनच्या वेळेस इमर्जन्सी, अपघात, थॅलेसेमिया (पंडुरोग) रक्ताक्षय, रक्त विकारात रुग्णांना याप्रसंगी रक्ताची गरज असते. रक्तपुरवठा मागणीला अनुसरून उपलब्ध न झाल्यास रुग्णाचे जीवन धोक्यात येते. म्हणून रक्तदान करूयात, रुग्णांच्या जीवनाला बळकटी देऊयात. आश्रय सामाजिक सांस्कृतिक शैक्षणिक ट्रस्ट ठाणे या संस्थेच्या माध्यमातून या उपक्रमासाठी अधिकच प्रेरणा मिळत आहे.



## संपादकीय...

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

# ऑपरेशन सिंदूर... जय हो!

अखेर भारताने पुन्हा एकदा पाकिस्तानवर हवाई हल्ला केलाच. केवळ हवाई हल्लाच करून केवळ दहशतवादी तळच उद्धवस्त केले नाहीत तर, जगासमोर पाकिस्तानचा खरा चेहरा समोर आणला. पहलगाम येथे २२ एप्रिल २०२५ रोजी झालेल्या दहशतवादी हल्ल्यात एका स्थानिकासह २५ जणांचा मृत्यू झाला. तेव्हापासून जनमानसात संतापाची भावना होती. एवढेच नव्हे तर, आंतरराष्ट्रीय स्तरावरून या नृशंस हत्येचा तीव्र निषेध करतानाच, भारताने याला सडेतोड प्रत्युत्तर द्यावे, असे मतही अनेक देशांकडून मांडण्यात आले होते. दस्तुरखुद्द पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बिहारमधील एका सभेत या दहशतवाद्यांना कल्पनातीत शिक्षा दिली जाईल, असा इशाराही दिला होता. वास्तविक, जम्मू आणि काश्मीरमधून कलम ३७० हटविल्यानंतर पाकिस्तान अस्वस्थ झाला आणि त्याने येथे दहशतवादी कारवाया तीव्र करण्याचा प्रयत्न केला. त्याचबरोबर या दहशतवादी कारवाया म्हणजे स्थानिक नागरिकांचा उद्रेक असल्याचे चित्र रंगवण्यास पाकिस्तानने सुरुवात केली. टीआरएफ अर्थात दी रेझिस्टन्स फ्रंट ही संघटना त्यातूनच उभी राहिली. ही संघटना म्हणजे पाकिस्तानस्थित लष्कर-ए-तैयबाचाच भाग आहे. याच टीआरएफने पहलगाम हल्ल्याची जबाबदारी घेतली होती. पण नंतर या संघटनेने हात झटकले. कदाचित, या आगळीकीबद्दल आपल्याला आयुष्यभराचा धडा मिळू शकतो, याची कल्पना टीआरएफला आली असावी. पहलगामची घटनाही स्थानिकांकडून घडली असावी, असा तर्कही पाकिस्तानने दिला. पाकिस्तानचे उपपंतप्रधान आणि परराष्ट्रमंत्री इशाक दार यांनी हे हल्लेखोर स्वातंत्र्यसैनिकही असू शकतात, असे म्हटले होते, हे उल्लेखनीय. पण, 'चुकीला माफी नाही,' हेच भारताचे तत्व आहे. त्याचीच प्रचिती पाकिस्तानला पुन्हा एकदा आली. पहलगाममध्ये दहशतवाद्यांनी पर्यटकांमधील केवळ पुरुषांना धर्म विचारून त्यांच्या माता, पत्नी, भगिनींसमोरच गोळ्या घालून ठार मारले. म्हणूनच सौभाग्यवतीचा सन्मान असलेल्या भांगेतील सिंदूरचेच नाव भारतीय लष्कराने पाकिस्तानविरोधात राबविलेल्या मोहिमेला देण्यात आले, 'ऑपरेशन सिंदूर'! तिन्ही भारतीय संरक्षण दलांनी मंगळवारी मध्यरात्री अवघ्या २५ मिनिटांत पाकिस्तान आणि पाकव्याप्त जम्मू काश्मीरमधील ९ दहशतवादी तळांना लक्ष्य केले. 'ऑपरेशन सिंदूर' या कारवाईत दहशतवाद्यांचे प्रमुख तळ उद्धवस्त करण्यात आले. यात सर्वात महत्त्वाचा तळ बहावलपूरमधील होता. जैश-ए-मोहम्मद या दहशतवादी संघटनेचे मुख्यालय तिथेच होते. या कारवाईत मसूद अझहर याचे १० नातेवाईक आणि चार जवळचे मित्र ठार झाले. पहलगाम हल्ल्याप्रमाणेच भारताच्या 'ऑपरेशन सिंदूर'बद्दलही आंतरराष्ट्रीय स्तरावरून प्रतिक्रिया आल्या. इस्त्रायलने भारताने केलेली कारवाई योग्य असल्याचे म्हटले आहे. तथापि, बहुतांश सर्व देशांनी या कारवाईवरून भारतावर टीका न करता दोन्ही देशांना सबुरीने घेण्यास सांगितले आहे. तर, पाकिस्तानचा हितचिंतक समजल्या जाणाया चीनने ही कारवाई दुर्दैवी असल्याचे म्हटले असले तरी, उभय देशांनी संयम दाखविण्याचा सल्ला देत भारताला थेट विरोध केलेला नाही. कारण, कितीही नाही म्हटले तरी पाकिस्तानकडूनच कुरापती केल्या जात असल्याची जाणीव सर्वच देशांना आहे. प्रत्यक्ष रणांगणात भारतासमोर टिकू न शकलेल्या पाकिस्तानने गेली तीन दशके भारताविरुद्ध छुपे युद्ध पुकारून उच्छाद मांडला आहे. मुंबईवरील २६/११ च्या दहशतवादी हल्ल्यासह इतर अनेक हल्ल्यात पाकिस्तानचा सहभाग असल्याचे सिद्ध झाले आहे. मात्र, पाकिस्तानने सदैव आपण स्वच्छ चारित्र्याचे असल्याचे दाखवण्याचा प्रयत्न केला. २००१ मध्ये तत्कालीन केंद्रीय गृहमंत्री लालकृष्ण अडवाणी यांनी पाकिस्तानात आश्रयास असलेल्या २० दहशतवाद्यांची यादी पाकिस्तानचा तत्कालीन हुकूमशहा परवेझ मुशर्रफ यांना सोपविली होती. त्यात १४ भारतीय होते. किमान त्यांचे प्रत्यार्पण करण्याची विनंती अडवाणी यांनी पाकिस्तानला केली होती. परंतु मुशर्रफ यांनी ही विनंती फेटाळताना, आवश्यकता पडल्यास पाकिस्तानातच खटला चालविण्यात येईल, असे म्हटले होते. विशेष म्हणजे, पाकिस्तानात सत्तेवर आलेल्या प्रत्येकाचा हाच सूर कायम राहिला आहे. आपण स्वतः दहशतवादाचा बळी असल्याचे सांगत जगाची सहानुभूती मिळविण्याचा प्रयत्न पाकिस्तान करत असतो. तसे आहे तर, देशात दहशतवादी तळ कसे? याचे उत्तरही पाकिस्तानलाच द्यावे लागेल. शिवाय, २०१६ मध्ये उरीनंतरचा सर्जिकल स्ट्राईक, २०१९मधील पुलवामानंतरचा एअर स्ट्राईक आणि आता पहलगामनंतर ऑपरेशन सिंदूर राबवण्यात आले. भारताने गेल्या १० वर्षांत पाकिस्तानमधील एवढे दहशतवादी तळ उद्धवस्त करूनही अशा कारवाया का सुरू आहेत? पाकिस्तानात असे किती तळ आहेत? हे प्रश्न उपस्थित होतातच. विशेष म्हणजे, निष्पाप नागरिकांवर हल्ले करणाया हमासला इस्त्रायलने ज्याप्रकारे धडा शिकवला, तसा भारताने पाकिस्तानलाही शिकवावा, असे मत पुढे येत आहे. वास्तविक हमास ही संघटना आहे तर, पाकिस्तान हा देश आहे. मात्र तरीही, आता केवळ असे स्ट्राईक न करता, भारताने पाकपुरस्कृत दहशतवादाची नांगी कायमची मोडून टाकण्याची गरज आहे. माजी लष्करप्रमुख मनोज नरवणे यांनी 'एक्स' या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर 'अभी पिक्चर बाकी आहे...' असे म्हटले आहे. कदाचित त्याचा तोच अर्थ असावा.


# सामाजिक न्याय आंदोलनाचा प्रभाव!

**पंतप्रधान मोदींनी अचानक केलेल्या जातगणनेच्या घोषणेमुळे देशात संभ्रम निर्माण झाला आहे. पहलगाममधील अतिरेकी हल्ल्यानंतर सरकार कठोर पावले उचलण्याऐवजी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय डावपेच रचत असल्याचे दिसते. भाजपने पूर्वी विरोध केलेली जातगणना आता राजकीय गरजेतून स्वीकारल्याचे चित्र आहे. विरोधकांचा प्रभाव कमी करण्यासाठी ही रणनीती असून, सामाजिक न्यायाच्या मुद्द्याला नवा जोर मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे.**

आधीच देशातील जातीयता नष्ट होत नाहीये. त्यात ही जातगणनेची घोषणा. पंतप्रधान, भारतीय जनता पक्षाचे अनेक नेते उच्चरवाने जाती आधारित जनगणनेला अनेक वर्षे विरोध करत होते. मग हे जातगणनेचे अचानक काय यांच्या डोक्यात शिरलंय? देशात पहलगाम येथील अतिरेकी हल्ल्याच्या संदर्भात, सरकार काय पावले उचलणार? पाकिस्तानला कसा धडा शिकवणार? या प्रश्नांच्या उत्तरांची अपेक्षा असताना हे काय भलतेच, अशा भावना अनेक देशवासीयांच्या मनात निर्माण झाल्या आहेत. मोदींचे भक्तही सैरभैर झालेत. 'मोदी करे सो कायदा', हे भक्तांच्या डोक्यात ठासून भरलेले असल्यामुळे, मोदींच्या या घोषणेचा विरोध तर करता येत नाहीये. गेली अनेक वर्षे जातगणनेचा विरोध करत आला असताना आता अचानक त्याच्या समर्थनार्थ बोलणार तरी कसे, हा गुंताही त्यांच्याने सुटत नाहीय. थोडक्यात पाकिस्तानवरचा हल्ला वा किमान सर्जिकल स्ट्राईक सरकार कधी करायचे ठरवेल ते ठरवो, सध्यातरी भक्तांवरच सर्जिकल स्ट्राईक झाल्याचे जाणवतेय!

नोटाबंदीचा निर्णय असो वा कोरोना काळातील लॉकडाऊनचा निर्णय असो, जनतेच्या जगण्यावर विशेष परिणाम करू शकतात, असे निर्णय कुणाच्या ध्यानीमनी नसताना अचानक जाहीर करणे ही मोदींची खासियत राहिली आहे; मात्र यावेळी या सगळ्या नाटकीय जाहिरातबाजीला, इतरही काही पदर आहेत. पहलगाम अतिरेकी हल्ल्याची निर्घृण व निंदनीय घटना घडताच, पुलवामाच्या वेळेप्रमाणे आपले शूटिंग व जाहीर सभा यात दंग राहणाऱ्या पंतप्रधानांनी, यावेळी आपला परदेश दौरा अर्धवट सोडून देशाकडे धाव घेतली. देशाचे गृहमंत्री लागलीच जम्मू-काश्मीरला धावले. सर्व राजकीय पक्षांना विश्वासात घेण्यासाठी लगोलग सर्वपक्षीय बैठक बोलावण्यात आली. त्यामुळे भारत सरकार पाकिस्तानशी अगदी लागलीच युद्ध छेडो न छेडो, किमान खऱ्या अर्थाने युद्धपातळीवर या हल्ल्याच्या मुळाशी जाण्याचे, त्यासाठी इतर सर्व बाबी बाजूला ठेवत सर्व लक्ष अतिरेकी हल्ल्यासंदभार्तील विचारविनिमय आणि त्यानुरूप कृतीवर केंद्रित करेल; अशी सहाजिक अपेक्षा होती. प्रत्यक्षात सरकारची पावले वेगळ्याच दिशेने पडू लागल्याचे जाणवते आहे.

अतिरेकी हल्ला होवो, कोरोनाच्या संकटात जनता अक्षरशः होरपळो किंवा अन्य काही संकट समोर येवो. त्याची दखल तर घ्यावी लागणारच, त्यामुळे ती घेऊ; मात्र आपल्या मूळ अजेंडावरून आपले लक्ष विचलित होऊ द्यायचे नाही, ही भाजपची बहुपरिचित आणि वारंवार अनुभवास येणारी कार्यपद्धती राहिलेली आहे. वर्षाचे बारा महिने, ३६५ दिवस आणि दिवसाचे २४ तास भाजप इलेक्शन मोडवर असते. सत्ता सांभाळण्यासाठी वा कसेबसे सत्तेवर चढण्यासाठी भाजपला जरी अन्य पक्षांसोबत आघाडी करावी लागत असली, तरी येनकेन प्रकारेण, 'शत प्रतिशत भाजप', हे त्यांचे लक्ष्यही त्यांच्या नेत्यांच्या कायम डोक्यात असते. त्यामुळे बिहार निवडणुकीच्या तोंडावर हे हल्ल्याचे आरिष्ट आले असले, तरी त्याचाही निवडणुकीसाठी कसा फायदा करून घेता येईल, ही त्यांची एक रणनीती आणि त्याचाच पुढचा भाग म्हणजे या हल्ल्याने विचलित न होता, लवकरच येऊ घातलेल्या बिहार विधानसभा निवडणुकीची जी तयारी सुरू आहे ती तशीच सुरू ठेवायची, ही दुसरी.




अगदी स्वातंत्र्यापासूनचा इतिहास तपासला, तर 'संसोपा (संयुक्त सोशलिस्ट पार्टी)ने बांधी गांठ, पिछडा पावे सौमें सांठ' ही घोषणा ज्येष्ठ समाजवादी चिंतक आणि नेते डॉ. राम मनोहर लोहियांनी १९६०च्या दशकात प्रथम दिली. समाजवाद्यांनी ती लावून धरली. त्यातूनच पुढे कालेलकर आयोग, मंडल आयोग आले. व्ही. पी. सिंगाच्या सरकारने मंडल आयोग लागू करून इतर मागासवर्गीयांना प्रथमच सवलती जाहीर केल्या. भाजपने सरकारचा पाठिंबा काढून घेत, हिंसक हिंदुत्वाची लाइन घेऊन रथयात्रा काढली आणि त्यातूनच पुढे सांप्रदायिक दंगे आणि धर्माच्या आधारे समाजाचे विभाजन करणाऱ्या बाबरी मशिदीचा विध्वंस साऱ्या जगाने अनुभवला. अलीकडच्या काळात जात जनगणनेचा मुद्दा सममाजवादी पक्षाचे अखिलेश यादव, राजदचे तेजस्वी यादव हेही मांडत असले, तरी याला खरी धार मिळवून दिली ती विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी. सत्ताधारी या नात्याने सरकारच्या घोषणेचे श्रेय भाजप लाटत असले तरी याचे सगळे श्रेय राहुल गांधी यांना, त्यामुळेच मिळते.

अर्थात, आज संघ प्रमुख मोहन भागवत पंतप्रधानांना भेटतात आणि उद्या सरकार जात जनगणना घोषित करते, याचा एक अर्थ हाही आहे की, संघ - भाजपच्या हे पक्के लक्षात आलेले आहे की, बिहार निवडणुकीत विरोधक जात जनगणनेचा मुद्दा तापवणार आणि त्याला जनतेचा प्रतिसाद मिळणार. त्यामुळे विरोधकांच्या या मुद्द्यावरील प्रचाराची हवा काढून घेण्याचा गेमप्लानही यापाठी असू शकतो. भाजप जात जनगणनेच्या अगदी प्रथमपासून ठाम विरोधी आहे. हिंदू खतरे में है, बटेंगे तो कटेंगे, एक है तो सेफ है, असे नारे देत भाजप एका बाजूला जातीत वाटल्या गेलेल्या हिंदूंना गोंजारायचा प्रयत्न करत असते, तर दुसरीकडे, मुस्लिम, ख्रिश्चन, दलित आदींबाबत जनसामान्यांमध्ये वैरभाव निर्माण करण्याचे प्रयत्न करीत असते. त्यामुळे जातवार जनगणना हिंदू एकजुटीच्या ढोंगाला सुरुंग लावेल, हे भाजप आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाला चांगलेच ठाऊक आहे. 'सब हिंदू एक' असा भ्रम पसरवत, हिंदूंमधील जाती-जातीत शिक्षण, व्यवसाय, अधिकार पदे, आर्थिक सुबत्ता या सर्व आघाड्यांवर जी प्रचंड विषमता आहे, ती झाकण्याचा संघ-भाजपचा डाव जात-वार जनगणना व्यवस्थितपणे केली, तर आकडेवारीसह किंवा पुराव्यानिशी उघडा पडेल. असे झाल्यावर तथाकथित हिंदुत्ववादी लाइन मतदारांच्या पचनी पडणे अवघड बनेल. हे धोके संघ-भाजपला पक्के ठावूक आहेत. त्यामुळेच जातीवर सवलती, किंवा जातीय विषमतेच्या आधारावर मागासवर्गीयांना विशेष संधी देण्याचे या देशात जेव्हा-जेव्हा प्रयत्न झाले, तेव्हा-तेव्हा संघ-जनसंघ- भाजपने त्याचा विरोध केला आहे. विरोध केवळ शाब्दिक वा प्रतीकात्मक नाही तर सत्तेवर असलेली सरकारे पाडण्याची कामे संघ- भाजपने केलेली आहेत. अगदी अलीकडच्या २०२४च्या लोकसभा निवडणुकीच्या वेळीही भाजपाने जात जनगणनेची मागणी करणारे काँग्रेस, समाजवादी, राष्ट्रीय जनता दल आदी पक्ष फुटीरतावादी असल्याचा जहाल प्रचार केलेला आहे.

शेतकऱ्यांच्या अभूतपूर्व आंदोलनासमोर आपणच लादलेले तीन कायदे सरकारला मागे घ्यावे लागले. सर्वोच्च न्यायालयाच्या फटकारानंतर वक्फबाबतही सरकारला माघार घ्यावी लागली. याचा अर्थ सरकारने सारे मनापासून स्वीकारले असे होत नाही. शेतकऱ्यांना पुन्हा गुंडाळण्याचा प्रयत्न सुरूच आहे. तसेच जात जनगणनेबाबतही सरकार करू शकते. याचे मुख्य कारण म्हणजे, एकदा व्यवस्थित आणि संपूर्ण जात जनगणना पार पडली की, प्रश्न तिथेच संपणार नाही. उलट मागासवर्गीयांच्या सद्यस्थितीबाबतची, त्यांच्यावर होत असलेल्या अन्यायाची, त्यांच्या शोषणाची सगळी गाथा असलेला पेटाराच उघडला जाणार आहे. एखाद्या मागास जातीचे जे प्रमाण लोकसंख्येत आहे, त्या प्रमाणात त्यांची सवलती मिळवण्याची लढाई सुरू होईल. सरकारला राखीव जागांवर असलेले ५० टक्क्यांचे बंधन हटवावे लागेल. थोडक्यात, सध्याच्या विषारी सांप्रदायिक राजकारणाच्या जागी सामाजिक न्यायाचे राजकारण प्रभावी बनेल.

# भाडेवाढ अटळ

मुंबईच्या सार्वजनिक वाहतुकीची शान ठरलेली बेस्ट बससेवा कधी नव्हे इतकी सध्या डबघाईला आली आहे. आता आर्थिक गर्तेतून या सेवेला बाहेर काढण्यासाठी तिकिटांची दरवाढ करणे अटळ ठरले आहे. तिकिटांचे दर दुप्पट करतानाच, वाहतूक सुविधेचा दर्जाही सुधारण्याचे आव्हान आता बेस्ट उपक्रमापुढे आहे. पूर्वापार बेस्ट उपक्रमाची परिवहन सेवा ही वीजपुरवठ्याशी जोडलेली असल्याने वाहतुकीतील तोटा झाकला जात असे. कालांतराने दोन्ही विभाग स्वतंत्र करण्यात आल्यानंतर सार्वजनिक वाहतूक सेवेतील अडचणींचा सामना 'बेस्ट'लाही करावा लागला. मात्र 'बेस्ट'च्या कारभारात भिनलेल्या अंतर्गत शिस्तीची गाडी घसरल्याने प्रवासीसंख्याही वाढेना, बसगाड्यांची संख्याही तोकडी आणि सुटे भाग-इंधन यांचा खर्चही हाताबाहेर अशा कात्रीत बेस्ट उपक्रम सापडला. २०१७-१८ या वर्षांत बेस्ट उपक्रमाकडे प्रतिदिन साधारण २६ लाख प्रवासी होते, त्यावेळी प्रवासी वाढतील या उद्देशाने तिकीटदर कमी करण्यात आले. मात्र दरकपातीमुळे फार काही प्रवासीवाढ झाली नाही. याउलट बेस्टच्या ताफ्यात नव्या बसगाड्यांच्या खरेदीला मात्र खीळ बसली. एके काळी चार हजारांच्या घरात असलेला बसचा ताफा आज २७६८ वर आला असून त्यातही भाडेपट्ट्यावरील बसगाड्यांची संख्याच अधिक आहे. बेस्टने मध्यंतरी मिनी बस, मिडीबस, पोस्टव्हॅनसारख्या बस अशा नव्या श्रेणी आणल्या. निमुळत्या गल्ल्या, अतिक्रमणांनी अरुंद झालेली वळणे आणि ठिकठिकाणी सुरू असलेली मेट्रोची कामे यामध्ये या छोट्या लांबीच्या बसगाड्या लवकर मार्ग काढतील, अशी अटकळ त्यामागे होती. मात्र, कंत्राटांमध्ये योग्य काळजी न घेतल्याने या बस धूळ खात पडून राहिल्या. त्याच काळात ॲपआधारित खासगी बससेवांनी आयटी-फायनान्स क्षेत्रातील तरुण पगारदारांना आपलेसे केले. बेस्ट मात्र त्यात मागे पडली. विजेवरच्या वातानुकूलित बस व डबलडेकर बसगाड्या वेळेत ताफ्यात आल्या नाहीत. या कंत्राटातील गैरप्रकारांची चौकशी व्हायला हवी.

# धोकादायक इमारती आणि असंवेदनशील प्रशासन

## प्रशासन संवेदनशील असणे गरजेचे

कागदावरचा कायदा वापरून धोकादायक इमारतींची समस्या सुटणार नाही. धोकादायक इमारतींची समस्या निकाली काढायची असेल तर प्रशासनाने थोडी संवेदनशीलता दाखवायला हवी. कायद्याने इमारत खाली करण्यासाठी प्रशासनाला अमर्याद अधिकार दिले आहेत. परंतु प्रशासनातील अधिकाऱ्यांनी घरमालक अथवा विकासक यांचा दुवा न होता, रहिवाशांच्या संवेदना समजून घेण्याचा प्रयत्न कायद्याच्या चौकटी बाहेर जाऊन केला तर शहरातील धोकादायक इमारतींची संख्या निश्चित कमी होऊ शकते. त्यासाठी सुस्त असलेल्या प्रशासनाला थोडे संवेदनशील व्हावे लागेल.



पावसाळा येण्यापूर्वी शहरातील धोकादायक आणि अतिधोकादायक इमारतींची यादी जाहीर करते. धोकादायक इमारतीत वास्तव्य करत असलेल्या नागरिकांना सुरक्षित स्थळी जाण्याकरिता ठाणे महापालिकामार्फत कायदेशीर नोटीस देण्यात येते. पावसाळ्यात अतिधोकादायक तसेच धोकादायक इमारती कोसळून जीवितहानी होऊ नये, यासाठी ठाणे महापालिका प्रशासनाकडून दरवर्षी शहरात सर्वेक्षण केले जाते, त्यानंतर अशा इमारतींची यादी जाहीर केली जाते. यंदा करण्यात आलेल्या सर्वेक्षणात धोकादाय इमारतींचा आकडा वाढल्याचे दिसून आले आहे. पूर्वी शहरात ४४०७ इमारती या धोकादायक होत्या. परंतु नव्याने करण्यात आलेल्या सर्वेक्षणात हा आकडा ८८ ने वाढला आहे. त्यातही अतिधोकादायक इमारतींची संख्या ही ९६ वरून ८७ वर आली आहे. परंतु आता पुन्हा करण्यात आलेल्या सर्व्हेत हा आकडा ४४९५ एवढा झाला आहे. याचाच अर्थ धोकादायक इमारतींची संख्या ही फुगवून दाखवली जात असल्याच्या शंकेला बळ मिळत आहे.

सध्या शहराच्या विविध भागात क्लस्टरच्या नावाखाली इमारती अतिधोकादायक केल्या जात असल्याचा आरोप केला जात आहे. अशातच महापालिकेच्या या सव्हेर्बाबतही शंका उपस्थित केल्या जाऊ लागल्या आहेत. धोकादायक यादी दोन महिन्यापूर्वीच महापालिका प्रशासनाने जाहीर केली होती. परंतु दुरुस्ती करण्यायोग्य आणि किरकोळ दुरुस्तीच्या इमारतींची संख्या वाढल्याचे दिसून आले आहे. यानुसार संपूर्ण शहरात ४ हजार २९७ इमारती धोकादायक असून त्यामध्ये ८६ इमारती अतिधोकादायक इमारतींचा समावेश आहे, यातील २५ इमारती पालिकेने यापूर्वीच रिकाम्या केल्या आहेत. त्यानंतर करण्यात आलेल्या सर्व्हेत वाढ होऊन हा आकडा ४४०७ वर गेला होता. परंतु आता पुन्हा करण्यात आलेल्या सर्व्हेत हा आकडा ४४९५ एवढा झाला आहे. ठाणे महापालिकेच्या अतिक्रमण विभागामार्फत पुन्हा नव्याने सर्वेक्षण करण्यात आले होते. महापालिका हद्दीतील इमारतींचे स्ट्रक्चरल ऑडिटसाठी महापालिकेवर ९० हून अधिक जणांचे पॅनल आहे, त्यांच्याकडून धोकादायक इमारतींचा सर्व्हे केला गेला असून त्यानुसार आता अंतिम यादी जाहीर करण्यात आली आहे.

यापूर्वी करण्यात आलेल्या सर्व्हेत अतिधोकादायक इमारतींची संख्या ही ९६ होती. ती आता ८७ वर आली आहे. दुसरीकडे सी २ ए इमारतींची संख्या यापूर्वी २०६ होती, ती संख्या कमी होऊन २०० वर आली आहे, तर सी २ बी इमारतींची संख्या ही २४८६ एवढी होती. ती संख्या आता २५३२ एवढी झाली आहे. यात ४६ इमारतींची भर पडली आहे. तर सी ३ मधील संख्या ही यापूर्वी १६१९ होती, तरी आता १६७६ एवढी झाली आहे.

विकासक आणि रहिवाशांमध्ये किंवा रहिवासी आणि मालकांमध्ये वाद असेल तर हा वाद सोडविण्यावर भर दिला पाहिजे, मात्र प्रशासन त्यांची बाजू सावरण्यासाठी कायमच रहिवाशांचा बळी देत असते. ठाण्यात देखील अशाच प्रकारे तक्रारी येत असून विकासाच्या फायद्यासाठी धडधाकट इमारती धोकादायक ठरवण्यात येत असल्याचा आरोप माजी नगरसेवकांनी करून प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर बोट ठेवले आहे. त्याचप्रमाणे रिकाम्या कराव्या लागणाऱ्या इमारतीतील मुलांची शाळा, महिलेला उदरनिवार्हासाठी करावी लागणारी नोकरी, अपुरे अर्थार्जन या मुळे कुटुंबाची आर्थिक घडी विस्कटली जाते, या कारणांमुळे रहिवासी घर सोडण्यास विरोध करतात.

### नाण्याची दुसरी बाजू

पावसाळा येण्यापूर्वी पालिका प्रशासन कागदी नोटीसा बजावून धोकादायक इमारतीत राहणाऱ्या नागरिकांना सुरक्षितस्थळी जाण्यासंदर्भात निर्देश देते. मात्र त्यानंतर त्या नागरिकांच्या होणाऱ्या त्रासाचा कोणीच विचार करत नाही. नोटीस बजावून पालिका आपले कायदेशीर कर्तव्याची पूर्तता करते, मात्र त्या धोकादायक इमारतीत आपला जीव टांगणीला लावून नागरिक का वास्तव्य करतात, याचा देखील विचार करणे आवश्यक आहे. इमारतीचा मूळ मालकाचा आडमुठेपणा, इमारत दुरुस्त करायची आहे पण तांत्रिक अडचणी आहेत, रहिवाशांची आर्थिक बाजू या मुद्द्यांचा विचार धोकादायक इमारतींच्या सर्वेक्षणादरम्यान केला जात नाही. इमारत खाली केल्यानंतर पुनर्वसन कसे आणि केव्हा होणार? याची कोणतीच खात्री नसल्यामुळे पुढे काय? हा मोठा प्रश्न त्या धोकादायक इमारतीत राहणाऱ्या नागरिकांसमोर असतो.पावसाळा येण्यापूर्वी पालिका प्रशासन कागदी नोटीसा बजावून धोकादायक इमारतीत राहणाऱ्या नागरिकांना सुरक्षितस्थळी जाण्यासंदर्भात निर्देश देते. मात्र त्यानंतर त्या नागरिकांच्या होणाऱ्या त्रासाचा कोणीच विचार करत नाही. नोटीस बजावून पालिका आपले कायदेशीर कर्तव्याची पूर्तता करते, मात्र त्या धोकादायक इमारतीत आपला जीव टांगणीला लावून नागरिक का वास्तव्य करतात, याचा देखील विचार करणे आवश्यक आहे. इमारतीचा मूळ मालकाचा आडमुठेपणा, इमारत दुरुस्त करायची आहे पण तांत्रिक अडचणी आहेत, रहिवाशांची आर्थिक बाजू या मुद्द्यांचा विचार धोकादायक इमारतींच्या सर्वेक्षणादरम्यान केला जात नाही. इमारत खाली केल्यानंतर पुनर्वसन कसे आणि केव्हा होणार? याची कोणतीच खात्री नसल्यामुळे पुढे काय? हा मोठा प्रश्न त्या धोकादायक इमारतीत राहणाऱ्या नागरिकांसमोर असतो.



# माहुलमधील घरांचा तिढा

**झोपडपट्टी पुनर्वसन योजनेंतर्गत (एसआरए) माहुलमधील भूखंड विकसित करण्यात आला. येथे घरे उभारून त्यापोटी मिळणारा लाभ घेऊन विकासक नामनिराळा झाला. महापालिकेच्या विविध प्रकल्पांमध्ये बाधित होणाऱ्या आणि ज्यांना कोणीही वाली नाही, अशा झोपडपट्टीवासीयांचे पुनर्वसन माहुल येथे केले आहे; मात्र पोलीस, महापालिका कर्मचाऱ्यांनी ही घरे नाकारली आहेत. काही कर्मचारी १२ लाखांत घर घेऊन विकतचे मरण घेत आहेत का? अशी चर्चा सोशल मीडियावर सुरू आहे.**

मुंबईला झोपडपट्टीमुक्त करण्यासाठी झोपडपट्टी पुनर्वसन योजना आणण्यात आली. या योजनेमुळे लाखो लोक आडव्या झोपडपट्टीतून उभ्या झोपडपट्टीत स्थलांतरित झाले. झोपडीधारकांऐवजी ही योजना विकासकांच्या अधिक लाभाची बनली. काही वर्षांपूर्वी उभारण्यात आलेल्या एसआरए योजनेतील इमारती आज मोडकळीस आल्या आहेत. अधिकारी, राजकारणी आणि विकासक यांच्या संगनमताने राबविण्यात आलेल्या एसआरए योजनेतील घोटाळे उजागर झाले आहेत. यापैकी एक प्रकल्प माहुलमधील गृहप्रकल्प म्हणावा लागेल.

माहुल परिसरात टाटा वीज कंपनीचा औष्णिक वीज प्रकल्प, विविध रासायनिक कंपन्या असलेल्या या भागात प्रकल्पग्रस्तांसाठी घरे उभारण्यात आली. कंपन्यांमधून बाहेर पडणाऱ्या विषारी वायूमुळे परिसरातील वातावरण प्रदूषित आहे. यामुळे या ठिकाणची घरे घेण्यास प्रकल्प बाधितही नकार देत आहेत. यानंतरही प्रकल्पबाधितांना न्याय देण्यास पालिका तयार नाही. ज्यांना वाली नाही अशा गोरगरीबांना माहुलमध्ये पाठविण्यासाठी पालिकेची सर्व यंत्रणा कामाला लागली आहे; मात्र हा भाग प्रदूषित असल्याने येथे स्थलांतरित होण्यास नागरिकच विरोध करून लागले आहेत.

आज येथील हजारो घरे ओस पडली असून, त्यामध्ये उंदरांचे साम्राज्य निर्माण झाले आहे. काही इमारतींमध्ये मुंबईभरातील प्रकल्पबाधितांचे पुनर्वसन करण्यात आले आहे, तर काही इमारती ओस पडल्या आहेत. या इमारतींमधील घरे काही वर्षांपूर्वी पोलिसांना सेवा निवासस्थान म्हणून देण्यात येणार होती; मात्र पोलिसांनी ओसाड आणि प्रदूषित भागात जाण्यास नकार दिला. यामुळे या ठिकाणी पोलिसांसाठी प्रशिक्षण केंद्र उभारण्याचे प्रस्तावित होते; मात्र या भागातील प्रदूषित हवेची स्थिती पाहता हा निर्णय पोलीस प्रशासनाने गुंडाळला.

प्रकल्पबाधितांसाठी उभारण्यात आलेली सुमारे १३ हजार घरे माहुलमध्ये रिकामी पडली आहेत. या घरांच्या देखभाल दुरुस्तीचा खर्च पालिकेला डोईजड झाला आहे. त्यामुळे येथील ९ हजार घरे विक्रीस काढण्याचा निर्णय पालिका प्रशासनाने घेतला आहे. ही घरे तृतीय आणि चतुर्थ श्रेणी कामगारांना प्रति घर १२ लाख ६० हजार रुपयांना देण्याची योजना आखली आहे. पालिका कर्मचाऱ्यांना एकाहून अधिक घरेही येथे खरेदी करण्याची सूट देण्यात आली आहे. यासाठी म्युनिसिपल बँकेकडून ८.५० टक्के व्याज दराने कर्ज उपलब्ध करून देण्यात येणार आहे. यासाठी कामगारांकडून अर्ज मागविण्यात आले. परंतु दिलेल्या मुदतीमध्ये केवळ १५० कर्मचाऱ्यांनी घरे घेण्यास रुची दर्शविली आहे, तर हजारो कामगारांनी याकडे पाठ फिरवली आहे.

पालिकेच्या महत्त्वाच्या विभागांमध्ये कार्यरत असलेले कर्मचारी विरार, नालासोपारा, ते बदलापूर, कर्जत-कसारा भागातून सकाळी लवकर मुंबईत कामावर येतात. या कर्मचाऱ्यांचा वेळ वाचवा अशी सुप्त आयडिया अधिकाऱ्यांनी लढवत ही घरे मध्यमवर्गीय कामगारांच्या गळ्यात मारण्याचा डाव आखला. परंतु हा डाव पुरता फसला आहे.

माहुलमध्ये यापूर्वी स्थलांतरित झालेले लोक काही ना काही आजाराने त्रस्त आहेत. प्रदूषणामुळे येथे वास्तव्यास आलेल्या अनेकांचे मृत्यू झाल्याचे येथे वास्तव्यास असलेले लोक सांगतात. राहण्यायोग्य नसलेली ही घरे गोरगरीबांच्या माथी मारून पालिकेचे वरिष्ठ अधिकारी अनेकांचा जीव धोक्यात का टाकू पाहत आहेत? हे न उलगडणारे कोडे आहे. प्रकल्पग्रस्त आणि विविध प्रशासनातील तृतीय आणि चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांना माहुलची घरे देण्याऐवजी प्रथम, द्वितीय दर्जाच्या अधिकाऱ्यांसाठी किंवा आमदारांच्या निवास्थानासाठी ती देण्याचे धाडस पालिका अधिकारी कधी दाखवतील. गरीबांना प्रदूषित, झोपडपट्टी भागात घरे आणि श्रीमंत अधिकाऱ्यांना समुद्रकिनाऱ्यालगतची घरे हा पालिकेचा न्याय दिसत आहे.

प्रकल्प राबविणारे आज या घरांचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी जागेवर नसतीलच; मात्र अशा प्रकरणात सरकारने पुढाकार घेऊन याबाबत जबाबदारी निश्चित करावी लागेल. तरच अशा निरुपयोगी कामांना आळा बसेल. याबरोबरच नागरी भागात असलेल्या रासायनिक प्रकल्पांमधून बाहेर पडणाऱ्या विषारी वायूवर नियंत्रण ठेवणेही तितकेच गरजेचे आहे. माहुल, शिवडी, वडाळा भागात रिफायनरी, तेल कंपन्या आणि रासायनिक कंपन्या आहेत. त्यामुळे हा भाग धोकादायक आहे. प्रदूषणामुळे या भागातील नागरिकांना विविध आजारांनी ग्रासले आहे. लहान मुले आजारी झाली आहेत. अणुशक्ती नगर, मानखुर्द, चेंबूर परिसराला प्रदूषणाची झळ जाणवते. त्यामुळे माहुल परिसर प्रदूषित असल्याचा निष्कर्ष उच्च न्यायालयाने काढत झोपडीवासीयांना येथे पाठवू नये, असे निर्देशही दिले आहेत आणि जे राहत आहेत त्यांना दुसऱ्या ठिकाणी जाण्याचे असल्यास पर्यायी घर किंवा भाडे द्यावे, असे आदेश दिले आहेत. यानंतरही महापालिका अधिकारी आपल्याच कुटुंबातील लोकांच्या जीवावर का उठले आहेत? हे अनाकलनीय आहे.

## पनीर-पुदिना कटलेट

**साहित्य :** २५० ग्राम ताजं पनीर, १/२ कप शिंगाड्याचे पीठ, २-३ हिरव्या मिरच्या, १/२ चमचा वाळवलेली पुदिन्याची पूड, १/२ चमचा लिंबाचा रस, बारीक चिरलेली कोथिंबीर, उपवासाचे मीठ चवीप्रमाणे.

**कृती :** पनीर कटलेट्स करण्यासाठी सर्वप्रथम पनीरला किसून घ्या. हिरव्या मिरच्यांना बारीक चिरून शिंगाड्याच्या पिठात पनीर आणि मिरच्या घाला. आता उरलेले साहित्य वाळवलेली पुदिन्याची पूड, लिंबाचा रस, मीठ, बारीक चिरलेली कोथिंबीर टाकून त्याला मिक्स करून हवे त्या आकाराचे कटलेट करा. तवा गरम करून त्यावर थोडे तूप किंवा शेंगदाण्याचे तेल टाकून दोन्हीकडून कुरकुरीत खमंग शॅलो फ्राय करून घ्या. तयार कटलेट्सला दही किंवा हिरव्या चटणीसोबत सर्व्ह करा.



# आपल्या स्वयंपाकघरातच आहेत सौंदर्यप्रसाधने



तुमच्या केसांपासून ते पायांच्या नखांपर्यंत सर्व गोष्टींची निगा राखण्यास मदत करण्यासाठी विविध तऱ्हेची सौंदर्यप्रसाधने बाजारामध्ये उपलब्ध आहेत. पण या सर्व प्रसाधनांमध्ये अगदी कमी प्रमाणात का होईना, पण रसायने असतातच. त्यामुळे क्वचितप्रसंगी या सौंदर्यप्रसाधनांमुळे ॲलर्जीदेखील उद्‍भवू शकते. हा धोका टाळायचा असेल, तर घरी तयार केलेली, नैसर्गिक पदार्थ असलेली प्रसाधने वापरणे कधीपण अधिक सोयीस्कर आणि फायद्याचे असते. घरी प्रसाधने तयार करण्यासाठी थोडाफार वेळ खर्ची घालावा लागत असला, तरी त्यापासून आपल्या त्वचेला किंवा केसांना मिळणारे फायदे पाहता, घरी प्रसाधने तयार करण्यासाठी थोडा वेळ जरूर द्यावा.



**साखर :** थंडीमध्ये किंवा उन्हाळ्यामध्ये ओठ कोरडे पडून खरखरीत होतात. याचा उपाय आपल्या स्वयंपाकघरामध्ये अगदी सहज उपलब्ध आहे, तो म्हणजे साखर. साखरेमुळे त्वचेवरील मृत पेशी हटवल्या जाऊन, त्वचेमध्ये कोलाजेनचे प्रमाण वाढते. याकरिता एक टीस्पून खोबरेल तेलामध्ये एक लहान चमचा मध मिसळावा. या मिश्रणात दोन मोठे चमचे साखर घालून, मग थोडासा लिंबाचा रस घालावा आणि हे मिश्रण व्यवस्थित एकत्र करावे. ही तयार झालेली पेस्ट ओठांवर हळुवार गोलाकार चोळावी. दहा मिनिटे ही पेस्ट ओठांवर राहू देऊन, त्यानंतर पाण्याने धुवून टाकावी. ओठ टॉवेलने हळुवार कोरडे करून व्हॅसलिन लावावे. या उपायाने ओठ नेहमी मृदू राहतील.



**ऑलिव्ह ऑईल :** नैसर्गिक मेकअप रिमूव्हर म्हणून ऑलिव्ह ऑईलचा वापर करावा. मेकअपसाठी वापरण्यात येणाऱ्या सौंदर्यप्रसाधनांमध्ये थोड्या प्रमाणात ॲस्ट्रिंजंट असते, ज्यामुळे आपली त्वचा कोरडी पडू लागते. मेकअप उतरवण्याकरिता ऑलिव्ह ऑईल वापरल्याने मेकअप संपूर्णपणे साफ होतोच, पण त्याशिवाय त्वचेचा कोरडेपणा दूर होऊन, त्वचेला आर्द्रता मिळते.

**टोमॅटो :** त्वचेची निगा राखण्याकरिता प्रत्येक वेळी ब्युटी पार्लरकडे धाव न घेता, घरच्या घरीच उत्तम फेस मास्क तयार करावा. नितळ, सुंदर त्वचेकरिता टोमॅटो अतिशय चांगला पर्याय आहे. टोमॅटोमधील 'अ' जीवनसत्त्व त्वचेवरील डाग हलके करण्यास सहाय्यक आहे. तसेच यामध्ये मॅग्नेशियम भरपूर प्रमाणात असल्याने त्वचेचा पोत सुधारून, त्वचा चमकदार बनते. हा मास्क बनवण्याकरिता एका टोमॅटोची पेस्ट चेहऱ्यावर लावून वीस मिनिटे राहू द्यावी. त्यानंतर चेहरा थंड पाण्याने धुवावा. या उपायाने त्वचा त्वरित उजळते.



**नारळ :** नारळाच्या दुधामध्ये 'ई' जीवनसत्त्व व केसांना पोषक नैसर्गिक तेले मुबलक मात्रेमध्ये असतात. ॲवोकाडोमध्ये केसांच्या पोषणासाठी आवश्यक प्रथिने व केसाच्या मुळांना पोषक तत्त्वे असतात. नारळाचे दूध व ॲवोकाडो वापरून तयार केलेला मास्क केसांसाठी वापरला असता, केस चमकदार आणि मुलायम बनतात. हा मास्क तयार करण्यासाठी ॲवोकाडो आणि नारळाचे दूध एकत्र करून त्यांची पेस्ट तयार करावी. ही पेस्ट केसांच्या मुळांपासून टोकांपर्यंत व्यवस्थित लावून घ्यावी. अर्धा तास ही पेस्ट केसांवर राहू देऊन त्यानंतर केस धुवावेत. या हेअर मास्कमुळे केसांच्या मुळांना ताकद मिळून, केसांची वाढ चांगली होते.

**मध आणि बदामाची पूड :** हात कोरडे पडून रखरखीत होत असल्यास त्यासाठी मास्क घरच्या घरी तयार करता येतो. एक लहान चमचा मधात थोडा लिंबाचा रस घालावा. त्या मिश्रणामध्ये एक मोठा चमचा बदामाची पूड व एक लहान चमचा अक्रोडची पूड घालावी. अक्रोडची पूड नसल्यास एक चमचा सूर्यफुलाचे तेल घालावे व हे मिश्रण हाताना चोळावे. पाच मिनिटांनी हात गार पाण्याने स्वच्छ धुवून टाकावेत. या उपायाने हात मुलायम राहतील.

# शहाळे : आरोग्याचा खजिना



कोवळा नारळ सर्वांनाच आवडतो. पण तो आरोग्यदायी घटकांचा खजिना असतो हे अनेकांना माहीत नसते. मोठे सेलिब्रिटीज, चित्रपट अभिनेते आणि अभिनेत्रींनाही नारळाच्या पाण्याचे महत्त्व कळते. अर्थात ते त्यांना कळते आणि ते हॉटेलातल्या महागड्या पेयांपेक्षाही शहाळे पिणे पसंत करतात. सामान्य लोकांनी त्यांचे अनुकरण म्हणून नाही पण नारळाचे महत्त्व समजून घेऊन त्याचा समावेश आपल्या रोजच्या आहारात केला पाहिजे. कोवळा नारळ हे निसर्गाने आपल्याला दिलेले वरदान आहे. २००६ साली करण्यात आलेल्या एका पाहणीनंतर शहाळ्याची वैशिष्ट्ये जर्नल ऑफ मेडिसिनल फूड या मासिकांत प्रकाशित करण्यात आली होती. त्यात शहाळ्याने शरीरातले कोलस्टेरॉल कमी होते असे म्हटले होते.

**आपल्याला** निसर्गाने नारळातून जे काही अनमोल असे दिले आहे त्यात कोणीही कसलीही भेसळ करू शकत नाही, हे त्याचे खास वैशिष्ट्य आहे. नारळाचे पाणी नेहमीच फ्रेश असते. ते कधी शिळे होत नाही. ते थंड असते. रक्तदाब नियंत्रणात ठेवण्यास त्याचा उपयोग होतो. एकदा याबाबत एक पाहणी करण्यात आली असता असे लक्षात आले की, पाहणीत गुंतलेल्या रुग्णांपैकी ७१ टक्के रुग्णांचा रक्तदाब कसलीही औषधे न देता केवळ शहाळ्याच्या पाण्याने कमी झाला. शहाळ्यातल्या मॅग्नेशियममुळे इन्सुलीन सेन्सिटीव्हिटी वाढते आणि मधुमेहाच्या रुग्णाला दिलासा मिळतो. ब्लड शुगर लेव्हल कमी होते. नारळाच्या पाण्यातले सोडियम आणि काही जीवनसत्त्वे ही ब्लड शुगर कमी करण्यास मदत करीत असतात. हे पाणी फ्री पार्टिकल्स आणि क्रिस्टल्स तयार करण्यास प्रतिबंध करते त्यामुळे किडनी स्टोन तयार होण्याचे टळते. काही कारणाने आणि अन्नात दोष निर्माण झाल्याने पचनशक्तीवर काही विपरीत परिणाम झाला असेल तर नारळाचे पाणी दिवसातून दोन वेळा प्यावे त्यामुळे पचनशक्ती ताळ्यावर यायला मदत होते. कारण या पाण्यात तंतुमय पदार्थ मोठ्या प्रमाणावर असतात. काही वेळा जुलाब होतात आणि डीहायड्रेशन होते. अशा वेळी नारळाचे पाणी प्यावे त्यामुळे शरीरातले पाण्याचे प्रमाण वाढते आणि डीहायड्रेशनमुळे आलेला अशक्तपणा कमी होतो. या पाण्याने चेहऱ्यावर तकाकी येते. केसही चांगले होतात. जगात गाजलेल्या काही टेनिसपटूंनी आपल्या तंदुरुस्तीचे रहस्य कोकोनट वॉटर हेच असल्याचे म्हटले होते. काही मॅरेथॉनपटूंनीही शहाळ्याला श्रेय दिले होते.



# 'ग्रीन टी'च्या अतिसेवनामुळे होऊ शकतात या समस्या

मागील काही वर्षांत भारतात ग्रीन टीचे सेवन अधिक वाढले आहे. ग्रीन टी आरोग्यासाठी चांगले आहे, यात शंकाच नाही. ग्रीन टीमध्ये अनेक प्रकारचे ॲंटीऑक्सिडेंट्स असतात. जे शरीरातील मेटाबॉलिज्म सुधारते, कॉलेस्ट्रॉल कमी करते. ग्रीन टी जिंक, मॅग्नीज आणि व्हिटामीन ए, बी, सी ची मात्रादेखील असते. मात्र हे सर्व फायदे असले तरी ग्रीन टीच्या अतिसेवनामुळे आरोग्याला देखील नुकसान पोहोचते.



**तोंडात फोडी येणे :** ग्रीन टीमध्ये टॅनिंस तत्त्व असते. जास्त ग्रीन टी प्यायल्याले टॅनिंस त्वचा कोरडी पडणे, तोंड कोरडे पडणे, पोट दुखणे आणि तोंडात फोडी येणे यासारख्या समस्या होतात.

**ब्ल्ड प्रेशर वाढते :** अधिक प्रमाणात ग्रीन टीचे सेवन केल्याने ब्लड प्रेशरचा देखील धोका निर्माण होतो. ग्रीन टीमध्ये कॅफिन अधिक मात्रेत असतात. याच्या अधिक सेवनाने हृदयावर दबाव पडतो व तुमचे ब्लड प्रेशर वाढते.

**अशक्तपणा होऊ शकतो :** ग्रीन टीमध्ये काही असे तत्त्व असतात, जे शरीरातील आयरनला (लोह) शोषून घेण्यापासून रोखते. त्यामुळे तुम्ही ग्रीन टीचे अधिक सेवन करत असाल तर तुम्ही ज्या पदार्थांचे सेवन करता त्यातील आयरन शरीराला मिळणार नाहीत. अशा परिस्थितीत रेड ब्लड सेल्स कमी होतात आणि अशक्तपणा येऊ शकतो.

**मानसिक तणाव आणि चिंता वाढणे :** ग्रीन टी तणाव कमी करण्यासाठी फायदेशीर आहे. मात्र अति सेवनामुळे याचा उलट परिणाम होऊन मानसिक तणाव आणि चिंतादेखील वाढते.

# गुणांचा खजिना - घृतकुमारी (ॲलोवेरा/कोरफड)

**ॲलो**वेरा आपल्या घरामध्ये किंवा ऑफिसमध्ये विनासायास लावता येण्यासारखे असते. आजकाल ॲलोवेराचे आरोग्याच्या दृष्टीने फायदे समोर यावयास लागल्याने रस, जेल अशा अनेक प्रकारे लोक ॲलोवेराचा उपयोग करताना दिसत आहेत. दात घासल्यानंतरही दातांमध्ये प्लाक किंवा किटाणू राहतातच. त्यामुळे तोंडामधून क्वचित दुर्गंधी येऊ लागते. ही दुर्गंधी येऊ नये यासाठी माऊथवॉश उपयोगात आणला जातो. ॲलोवेराच्या रसाचा वापरदेखील प्राकृतिक माऊथवॉश म्हणून करता येतो. या रसामुळे तोंडातील प्लाक आणि किटाणू दूर होऊन दातांचे आरोग्य चांगले राहते. ॲलोवेराचा वापर माऊथवॉश म्हणून केल्याने हिरड्याही बळकट होतात. कित्येकदा जेवण जास्त झाल्याने, जेवणाच्या वेळा गडबडल्याने किंवा जास्त तिखट, मसालेदार पदार्थ खाल्ल्याने छातीत जळजळ होत असल्याची भावना होते किंवा ॲसिडीटी होते. अशावेळी ॲलोवेराच्या रसाच्या सेवनाने फायदा होतो. यामुळे छातीतील जळजळ दूर होऊन ॲसिडीटीही कमी होते. तसेच दररोज सकाळी रिकाम्या पोटी ॲलोवेराचा रस कोमट पाण्यातून घेतल्यास पोट साफ होण्यास मदत होते. केस गळत असल्यास ॲलोवेराचा गर केसांना लावल्याने फायदा होतो. तसेच चेहऱ्यावर उष्णतेमुळे मुरुमे येत असल्यासही ॲलोवेराच्या गराने फायदा होतो. या गराने त्वचेचा रंग उजळण्यास व पोत सुधारण्यास मदत होते. त्याचमुळे पुष्कळशा स्कीन क्रीम्समध्ये ॲलोवेराच्या गराचा अंश मिसळलेला असतो. ॲलोवेराच्या गराच्या वापराने वयपरत्वे त्वचेवर आलेल्या सुरकुत्याही कमी होतात व त्वचा सुंदर दिसू लागते.



# जुन्या मोबाइल फोनचा स्पीड कसा वाढवायचा? जाणून घ्या सोप्या ट्रिक्स

अनेक वर्ष एकच मोबाइल फोन वापरल्यामुळे तो स्लो होऊ शकतो. असा स्मार्टफोन काही ट्रिक्सच्या मदतीने फास्ट करता येतो. यात फॅक्ट्री रीसेट, ॲंड्रॉइड अपडेट, फोन स्टोरेज क्लियर करणे, लाइट ॲप्सचा वापर इत्यादी ऑप्शन आहेत.



असे अनेक लोक आहेत जे एक मोबाइल कमीत कमी ३-४ वर्ष वापरतात. विशेषतः मीडिल क्लास कुटुंबात युजर एकच स्मार्टफोन अनेक वर्ष वापरतात. परंतु स्मार्टफोन जुना झाल्यावर त्याची परफॉर्मन्सदेखील स्लो होऊ लागतो. त्यामुळे रोज फोन वापरताना समस्या येऊ लागतात. ही समस्या सोडवण्यासाठी आम्ही काही ट्रिक्स सांगितल्या आहेत ज्यामुळे जुन्या फोनचा स्पीड वाढू शकतो.

फॅक्ट्री रीसेटमुळे अनेक समस्या सोडवता येतात. फॅक्ट्री रीसेट तुमच्या स्मार्टफोनला पुन्हा फास्ट, स्मूद व नव्यासारखा बनवण्याची चांगली पद्धत आहे. स्मार्टफोन रीसेट करण्यापूर्वी तुमच्या मोबाइल फोनच्या डेटा बॅकअप घेणं आवश्यक आहे. तुम्ही मोबाइलमधील सर्व ॲप्स, फोटो, व्हिडीओ तसेच अन्य फाईल्स देखील तुमच्या डाटा बॅकअपमध्ये घेऊ शकता. फोन बॅकअप स्मार्टफोनमधील मायक्रोएसडी कार्ड किंवा गुगलमध्ये स्टोर केला जाऊ शकतो, त्यामुळे फोन फॅक्ट्री रीसेट झाल्यानंतर पुन्हा रिकव्हर करता येईल.

**ॲंड्रॉइड अपडेट**

ॲंड्रॉइड स्मार्टफोन्स गुगलद्वारे बनवण्यात येणाऱ्या ॲंड्रॉइड ओएसवर चालतात. ही कंपनी दरवर्षी आपल्या ॲंड्रॉइड ऑपरेटिंग सिस्टमचं नवीन व्हर्जन घेऊन येते ज्यात अनेक नवीन अपडेट असतात. विशेष म्हणजे ॲंड्रॉइड ओएसचा नवीन अपडेट फक्त नवीन फीचर्स घेऊन येत नाही तर त्यात अनेक बग्स काढले जातात. वेगवेगळ्या ॲप्स, वेबसाइट्स, गेम्स, ऑनलाइन ॲक्टिव्हिटी तसेच इंटरनेट ॲक्सेसमुळे तुमच्या स्मार्टफोनमध्ये अनेक प्रकारचे बग्स देखील येतात त्यामुळे फोनच्या प्रोसेसिंगवर एक्स्ट्रा लोड येतो. हे बग्स फक्त प्रोसेसिंग स्लो करत नाहीत तर अनेक ॲप्सवर देखील प्रभाव टाकतात. ॲंड्रॉइड अपडेट्समध्ये डेव्हलपर हे बग्स काढून टाकण्याचे कोड टाकतात. त्यामुळे तुमचा स्मार्टफोन कायम नवीन ॲंड्रॉइड व्हर्जनवर अपडेट करावा.

**फोन स्टोरेज**

फोनची स्टोरेज भरल्यामुळे डिव्हाइसच्या प्रोसेसिंगवर प्रभाव पडतो आणि तो स्लो होतो. Support.google नुसार जर तुमच्या स्मार्टफोनची स्टोरेज ९० टक्क्यांपर्यंत फुल होते तेव्हा फोनमध्ये प्रॉब्लम येण्यास सुरुवात होऊ शकते. अशावेळी तुमच्या फोन स्टोरेज वर लक्ष ठेवावं आणि अनावश्यक फोटोज व व्हिडीओज डिलीट करावे. अत्यावश्यक मीडिया फाइल्सचा इतरत्र बॅकअप घेऊन मोबाइलमधून काढून टाकाव्यात.

**लाइट ॲंड्रॉइड ॲप्सचा वापर**

लाइट ॲंड्रॉइड ॲप्स जुन्या मोबाइल फोन्ससाठी उपयुक्त ठरू शकतात. हे ॲप्स फोनमध्ये कमी स्टोरेज वापरतात तसेच जास्त इंटरनेट देखील वापरत नाहीत. असे ॲप्स वापरल्यावर फोनच्या प्रोसेसर व बॅटरीवर देखील जास्त लोड येत नाही. विशेष म्हणजे लाइट ॲंड्रॉइड ॲप्स फुल व्हर्जनच्या फास्ट असतात. हे लाइट ॲंड्रॉइड ॲप्स कमी रॅम व जुन्या प्रोसेसरवर देखील स्मूद तसेच लॅगफ्री चालतात. उदा. जीमेल गो, गुगल गो, यूट्यूब गो आणि मॅप्स गो तसेच फेसबुक लाइट, मॅसेंजर लाइट, इंस्टाग्राम लाइट इत्यादी.

## 'या' समस्यांना टाळायचं असेल तर साखरेला ठेवा दूर!

**आपल्या** रोजच्या आहारात कमी अधिक प्रमाणात साखरेचं प्रमाण चांगलंच असतं. काही वेळा प्रत्यक्षरीत्या तर काही वेळा अप्रत्यक्षरीत्या साखर आपल्या शरीरात जात असते. साखर शरीरासाठी आवश्यक घटक आहे. मात्र या साखरेचं प्रमाण नियंत्रणात ठेवण्याचीही तितकीच गरज आहे. कोणत्याही गोष्टीचा अतिरेक हा घातक ठरू शकतो. त्याप्रमाणेच साखरेचंही आहे. शरीरात साखरेचं प्रमाण अधिक असेल तर अनेक आजारांना सामोरं जावं लागतं. त्यामुळे आहारात साखरेचं प्रमाण नियंत्रणात असण्याची गरज आहे.



- आहारात साखरेचं प्रमाण जास्त असेल तर त्याचा परिणाम थेट तुमच्या चेहऱ्यावर दिसून येतो. त्यामुळे साखरेचं प्रमाण नियंत्रणात असण्याची गरज आहे. शरीरात साखरेचं प्रमाण नियंत्रणात असेल तर त्वचेचा पोत सुधरतो. त्वचा मुलायम आणि तजेलदार होते. विशेषतः रात्रीच्या वेळी साखरयुक्त पदार्थ कमी खाल्ले तर चेहऱ्यावर सुरकुत्या येत नाहीत. तसंच चेहऱ्यावरील मुरुम, डागही क मी होतात.
- साखरेचं प्रमाण नियंत्रणात असेल तर शांत झोप लागते.
- साखर जास्त खाल्ल्याने जळजळ आणि श्वासोच्छ्वास घेण्यास त्रास होतो.
- साखर खाल्ल्यामुळे वजन झपाट्याने वाढतं. त्यामुळे डोनट्स, पेस्ट्री, केक, मिठाई असे पदार्थ शक्यतो खाणं टाळा.
- साखरेचे प्रमाण जास्त असल्यास स्मरणशक्ती कमकुवत होते.
- साखरेमुळे मधुमेह होण्याची शक्यता असते.

# ओठांचा काळसरपणा दूर करण्यासाठी उपाय...

ओठ काळसर पडण्यामागे अनेक कारणे असू शकतात. असंतुलित आहार, पिग्मेंटेशन, खूप वेळ उन्हामध्ये वावरणे, हलक्या प्रतीची प्रसाधने, विशेषतः हलक्या प्रतीची लिपस्टिक वापरणे, अशा किती तरी कारणांमुळे ओठ काळसर पडू शकतात. पण काही साध्या उपायांचा अवलंब केल्यास ओठांचा रंग पुन्हा

**ग्रीन टी**

आपण दिवसभरात अनेकदा चहा किंवा कॉफी घेत असतो. पावसाळ्यात किंवा थंडीच्या मोसमात तर चहा किंवा कॉफी पिण्याचे प्रमाण अजूनच वाढते. पण चहा किंवा कॉफीच्या अतिसेवनाने देखील ओठ काळसर दिसू शकतात. त्यामुळे दिवसातून अनेकदा चहा किंवा कॉफी घेण्यापेक्षा, ग्रीन टीच्या सेवनाचे प्रमाण वाढवा. ग्रीन टीमध्ये असलेले पॉलिफेनॉल्स शरीरातील फ्री रॅडिकल्स कमी करून, उन्हामुळे किंवा चहा - कॉफीच्या अतिसेवनाने काळसर पडलेले ओठ पुन्हा पूर्ववत करण्यास मदत करतात. ग्रीन टी च्या टी-बॅग्स थोड्याशा पाण्याने ओलसर करून घेऊन, त्याने ओठांवर हलक्या हाताने मसाज केल्यासही ओठांचा काळसरपणा दूर होण्यास मदत मिळते, तसेच ओठ मऊ राहतात.



**नारळ :** आपल्या आहारात नारळाचा समावेश अवश्य करा. हे आपल्याला निरनिराळ्या प्रकारे करता येईल. नारळाचे पाणी प्या, त्याचे ताजे खोबरे भाज्यांवर किंवा गरमागरम पोहे, उपमा, खिचडीवर घालून खा किंवा कुठल्याही भाजीच्या ग्रेव्हीमध्ये नारळाचे दूध वापरा. नारळाचे तेलही स्वयंपाकामध्ये वापरता येऊ शकेल. नारळाच्या सेवनाने त्वचा नितळ राहते. नारळाचे तेल दररोज ओठांना लावल्यास ओठ गुलाबी व मऊ राहतील.

**मध :** रात्री झोपण्यापूर्वी थोड्या मधाने ओठांवर हलक्या हाताने मसाज करावा. हे मध रात्रभर ओठांवर तसेच राहू द्यावे. मधाचा वापर आपल्या आहारामध्येही नियमित करावा. मधात ॲंटी ऑक्सिडंट्स व मॅग्नेशियम हा क्षार भरपूर प्रमाणात असल्यामुळे ओठांना मृदुता प्राप्त होऊन, त्यांचा काळसरपणा दूर करण्यास मध उपयुक्त आहे. त्याचप्रमाणे टोमॅटोही ओठांचा काळसरपणा दूर करण्यासाठी उत्तम आहेत. यामध्ये असलेले सेलेनियम सूर्याच्या प्रखर उन्हापासून ओठांचे रक्षण करते. टोमॅटोचा वापर आपल्या आहारामध्ये तर करावाच, शिवाय उन्हामधून फिरून आल्यानंतर त्वरित टोमॅटोची पेस्ट ओठांवर लावावी. असे केल्याने, उन्हामुळे ओठांवर आलेला काळसरपणा दूर होतो.



**अक्रोड :** अक्रोडमध्ये असलेले ओमेगा ३ फॅटी ॲसिड्स त्वचेमधील कोलाजेन वाढवण्यास सहाय्य करतात. त्वचेमध्ये कोलाजेनचे प्रमाण वाढल्याने त्वचा लवचिक होते. अक्रोडची जरा जाडसर पेस्ट बनवून त्याने ओठांवर हलक्या हाताने मसाज करावा. असे केल्याने ओठांच्या त्वचेवरील मृत पेशी निघून जाऊन ओठांचा काळसर पडलेला रंग हलका होण्यास मदत होईल. तसेच दह्याच्या वापराने त्वचा नितळ होऊन त्यावरील सुरकुत्या नाहीशा होण्यास मदत मिळते. त्यामुळे आपल्या आहारामध्ये दह्याचा समावेश अवश्य करावा. दह्यामध्ये थोडेसे केशर घालून त्याने ओठांचा मसाज केला असता, ओठांवरील पिग्मेंटेशनमुळे आलेला काळसरपणा दूर होण्यास मदत मिळेल.

**लिंबाचा रस :** आपल्या शरीरामधील ॲसिड्स व तीव्र अल्कलींमुळे ओठ काळसर पडू शकतात. गरम पाण्यामधून लिंबाचा रस घेतल्याने शरीरामधून ही ॲसिड्स व अल्कली बाहेर टाकण्यास मदत मिळते. लिंबू हे अत्यंत प्रभावी ब्लीच आहे. थोडीशी साखर एका लिंबाच्या लहान फोडीवर घालून त्याने ओठ चोळल्यास ओठांचा काळसरपणा दूर होतो. त्याचप्रमाणे ॲलो व्हेरा किंवा कोरफड, ओठांचा काळसरपणा दूर करण्यास उपयुक्त आहे. ॲलो व्हेराच्या रसाचा समावेश आपल्या आहारात करावा आणि त्याच्या गराने ओठांवर नियमित मसाज करावा. या उपायाने ओठांचा काळसरपणा दूर होऊन ओठ पुनश्च गुलाबी व मृदू होतील.



# पी हळद आणि हो बरी

**मराठीत** एक म्हण आहे. पी हळद अन् हो गोरी. या म्हणीचा अर्थ काही वेगळा आहे. कोणत्याही उपायाचा परिणाम पटकन होत नसतो. हळद प्यायल्यावर लगेच कोणी गोरी होत नसते असे या म्हणीतून सुचवायचे आहे, पण प्रत्यक्षात मात्र हळद ही काही बाबतीत चटकन आणि बराच गुण देणारी आहे. असे काही प्रयोगातही दिसून आले आहे. काही लोकांनी हळद मिसळलेले पाणी दररोज सकाळी प्राशन करून त्याचे फायदे नोंदवले आहेत तर काहींनी हळदीचा चहा किती गुणकारी असतो याचा अनुभव घेतला आहे. दररोज सकाळी साधारण ग्लासभर पाणी घ्यावे. ते गरम करावे आणि कोमट झाल्यावर त्यात अर्धा चमचा हळद मिसळावी. हे पाणी थंड झाल्यावर प्यावे त्याचे अनेक फायदे होतात.



हळद ही जंतुनाशक असते. त्यामुळे ती अनेक रोगांचा सामना करण्यास उपयोगी पडते. काही वेळा ती काही रेडिएशन्सचाही प्रतिकार करण्यास फायदेशीर ठरली आहे. सध्या आपण मोबाईल फोन फार वापरतो आणि त्याच्या रेडिएशन्सचा आपल्यावर काही परिणाम होण्याची शक्यता असते. आपल्याला कोणत्या ना कोणत्या स्वरूपात हळद वापरायला मिळाली तर अशा परिणामांपासून आपण दूर राहू शकतो. हळद पाण्यात मिसळून प्यावी किंवा आहारात तिचा समावेश अवश्य होईल याची दक्षता घ्यावी. आपल्या समाजात दूध आणि हळद पिण्याची पद्धत आहे. त्यामुळे बसलेला घसा मोकळा होतो. घशाला कसला संसर्ग झाला असेल तर हळद आणि दूध गुणकारी ठरते. खोकला आल्यावर तर हळद आणि दूध घेतातच. ते घेतल्यावर दुसरे कसलेही औषध घेण्याची गरज नाही असे मानतात.

काही लोक हळदीचा चहा तयार करतात. तो तयार करण्याची पद्धत आहे. कपभर पाण्यात चमचाभर हळद टाकून हे मिश्रण उकळा. नंतर त्याला खाली उतरवून त्यात थोडा मध टाका. त्याशिवाय त्यात थोडे लिंबू पिळा किंवा त्यात संत्र्याचा रस मिसळा. त्यामुळे या मिश्रणाला चांगली चव येईल. असा हा चहा प्याल्याने वजन कमी होण्यास मदत होते. संधिवाताचा त्रास कमी होतो. शिवाय यात काही मिनरल्स रोगप्रतिकारक आणि कर्करोगास प्रतिबंध करणारे आहेत. जगाच्या काही भागात हळदीचा असा चहा फार लोकप्रिय आहे. कारण त्यामुळे मधुमेहाचा उपद्रव कमी होतो. हळद हे अगदी सहजगत्या उपलब्ध होणारे औषध आहे. त्याचा वापरही आपण करीत असतो, पण त्याचे अनेक फायदे आपल्याला माहीतही नसतात.

# लाचखोरीचा कहर, रायगडमधील २ तलाठ्यांसह मंडळ अधिकारीही एसीबीच्या जाळ्यात, कोर्टातील शिपायालाही पकडले



**■अलिबाग :** रोहा तालुक्यातील भालगाव येथील तलाठी फिरोज मुजावर याला १० हजार रुपयांची लाच घेताना नवी मुंबई लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) मंगळवारी (६ मे) रंगेहाथ पकडले. त्याला गुरुवारी कोर्टात हजर केले जाणार आहे. त्याने रोहा तालुक्यातील कांडणे गावातील शेतजमिनीवरील वारस नोंदीसाठी शेतकऱ्याकडे १५ हजार रुपयांची लाच मागितली होती. एवढेच नाही तर ५ हजार रुपये गुगल पेच्या माध्यमातून आधीच घेतले होते. शेतकऱ्याने याची तक्रार नवी मुंबई एसीबीकडे केल्यानंतर त्यांनी खात्री केली आणि १० हजार रुपयांसाठी सापळा रचला. त्यामुळे उर्वरित १० हजार रुपये घेताना फिरोज मुजावर एसीबीच्या जाळ्यात सापडला. पोलीस उपअधीक्षक नितीन दळवी यांच्या नेतृत्वाखालील पथकाने ही कारवाई केली. त्यात नितीन पवार, गिरासे, योगीराज नाईक, दीपाली सावंत, योगिता चाळके आणि चालक हवालदार रतन गायकवाड यांचा सहभाग होता.

### लाचखोर महिला तलाठी, मंडळ अधिकारीही जाळ्यात

रेवदंड्यामधील आगरकोट येथील जागेवर वारस नोंद करण्यासाठी ५ हजार रुपयांची लाच स्वीकारताना महिला तलाठी वसुंधरा धोंडू धुमाळ (५४) यांना रायगड एसीबीने पकडले आहे. त्याचवेळी लाचेची उर्वरित 5 हजार रुपयांची रक्कम नंतर देण्यासाठी इशारा करणारा लाचखोर मंडलाधिकारी विजय विश्वनाथ मापुसकर (५७) यांनाही रायगड एसीबीने ताब्यात घेतले आहे. सर्व्हे क्रमांक २०/१, २०/२, २१/१, २१/३, २१/४, २३/५ या जमिनींचे सातबारा उताऱ्यावर वारस नोंद करण्याकरिता प्रकरणाची कागदपत्रे जमा करण्यासाठी ५ मे २०२५ रोजी तक्रारदार रेवदंडा कार्यालयात मंडळ अधिकारी विजय विश्वनाथ मापुसकर आणि तलाठी वसुंधरा धुमाळ यांना भेटायला गेले. दोघांनी प्रत्येकी ५ हजार रुपयांची मागणी केली. याची तक्रार रायगड एसीबीकडे ६ मे रोजी दाखल झाल्यानंतर बुधवारी (७ मे) दोघांना सापळा पंचासमोर लाच स्वीकारताना पकडले. ही कारवाई रायगड लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे उपअधीक्षक शशिकांत पाडावे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक फौजदार विनोद जाधव, अरुण करकरे, हवालदार महेश पाटील, हवालदार सुषमा राऊळ, चालक पोलीस शिपाई सागर पाटील यांच्या पथकाने केली आहे.

### कोटार्तील शिपाई एसीबीच्या जाळ्यात

नवी मुंबईतील वाशी सेक्टर ११ मधील एका अनधिकृत इमारतीच्या बांधकामाबाबत सिडको कार्यालय आणि नवी मुंबई महापालिकेने सोसायटीला इमारत पाडण्यासाठी नोटीस बजावली होती. या संदर्भात सोसायटीने प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, सीबीडी बेलापूर ९वे कोर्ट, नवी मुंबई यांच्याकडे कारवाई विरोधात स्थगिती मिळण्यासाठी अपील दाखल केले होते. स्थगिती मिळाल्यानंतर आदेशाचे कागदपत्रे मिळण्यासाठी शिपाई संतोष माने याने अडीच हजारांची लाच मागितली होती. त्याची तक्रार केल्यानंतर एसीबीने सापळा रचून बुधवारी संतोष माने याला लाच घेताना रंगेहाथ पकडले.

# मिरा-भाईंदर शहरास २४ तास पाणीपुरवठा बंद



**■भाईंदर :** मिरा-भाईंदर शहरास स्टेम प्राधिकरण आणि महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (एम.आय.डी.सी.) प्राधिकरणाकडून पाणी पुरवठा करण्यात येतो. शहराला एमआयडीसीकडून करण्यात येणारा पाणीपुरवठा देखभाल दुरुस्तीच्या कामांसाठी शुक्रवारी २४ तासासाठी बंद ठेवण्यात येणार आहे. जांभुळ येथील जलशुद्धीकरण केंद्रातील अत्यंत महत्वाच्या देखभाल दुरुस्तीचे काम करण्यासाठी २४ तासांचा शटडाऊन घेतला जाणार आहे. त्यासाठी गुरुवार ८ मे रोजी रात्री १२ ते शुक्रवार ९ मे रोजी रात्री १२ वाजेपर्यंत असा एकूण २४ तास मिरा-भाईंदर शहरास महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून होणारा पाणी पुरवठा पूर्णपणे बंद राहणार आहे. तसेच स्टेम प्राधिकरणाकडून होणारा पाणी पुरवठा सुरु राहणार आहे. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून होणारा पाणी पुरवठा पूर्ववत होईपर्यंत मिरा झ्र भाईंदर शहरास पाणी पुरवठा कमी दाबाने व उशीराने होईल. त्यामुळे नागरिकांनी पाण्याचा वापर काटकसरीने करावा व महापालिकेस सहकार्य करावे असे कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा व मलनिःसारण विभागाचे कार्यकारी अभियंता शरद नानेगांवकर यांनी आवाहन केले आहे.

# पॅलेस्टाईन आणि गाझा पट्टीतील लोकांना मदत करा

## बीडमध्ये एकाने निधी गोळा केला, एटीएसला कुणकुण लागली अन्...




**■बीड :** बीड जिल्ह्यातील गेवराई येथे पॅलेस्टाईन व गाझा पट्टीतील नागरिकांसाठी मदतीच्या नावाखाली, हिमायत फाऊंडेशनच्या माध्यमातून सोशल मीडियावरून निधी जमा करण्यात येत होता. मात्र, जमा झालेला निधी स्वतःच्या फायद्यासाठी वापरल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणाची गंभीर दखल घेत दहशतवाद विरोधी पथकाने तात्काळ कारवाई करत स्वतः पुढाकार घेऊन गेवराई येथील कुरेशी शाहरुख उर्फ छोटू मिया याच्या विरोधात गुन्हा नोंदवला आहे.

शाहरुख उर्फ छोटूमिया कुरेशी (रा. राजगली, गेवराई, जि. बीड) याने हिमायत फाऊंडेशन या एनजीओला परदेशातील उद्दिष्टांसाठी काम करण्याचा अधिकृत परवाना नसतानाही, सोशल मीडियावरून गेवराई शहरातील नागरिकांचा विश्वास संपादन करत गाझामधील नागरिकांना मदत करण्याचे आवाहन केले. मात्र, फाऊंडेशनच्या अधिकृत बँक खात्यावर देणगी न घेता, कुरेशीने स्वतःच्या वैयक्तिक बँक खात्यांचा दफ कोड वापरून निधी जमा केला आणि लाखोंचा निधी स्वतःच्या फायद्यासाठी वापरल्याचे समोर आले आहे. परिणामी, अनेक नागरिकांची फसवणूक झाल्याचे उघडकीस आले आहे.

### मदतीच्या नावाखाली केला निधी जमा

सध्या देशभरात पाकिस्तानी आणि बांगलादेशी नागरिकांच्या शोध मोहीमा सुरू असतानाच हिमायत फाऊंडेशन या एनजीओला परदेशात काम करण्याचा अधिकृत परवाना नसतानाही मदतीच्या नावाखाली निधी जमा करण्याचा प्रयत्न केल्याने या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन तातडीने कारवाई करण्यात आली. सध्या या प्रकरणाचा पुढील तपास पोलिसांकडून करण्यात येत आहे.

दरम्यान, गेल्या काही वर्षांत एनआयए आणि दहशतवाद विरोधी पथकांनी दहशतवादाशी संबंधित अनेक ह्मोड्युल्सह्नचा पदार्फाश करून त्यांना उद्धवस्त केले आहे. सोशल मीडियाच्या माध्यमातून तरुणांची भरती करणाऱ्या दहशतवादी संघटनांचे भयावह वास्तव समोर येत आहे. या संघटना आपल्या विध्वंसक कारवायांसाठी आवश्यक असलेले मनुष्यबळ मिळवण्यासाठी सोशल मीडियाचा प्रभावीपणे वापर करत आहेत. याशिवाय, डार्क वेबचा वापर करून मोठ्या प्रमाणावर दहशतवादी हल्ल्यांचे नियोजन, शस्त्रास्त्रांची खरेदी आणि आर्थिक व्यवहार घडवले जात आहेत. डार्क वेबमुळे निर्माण होणारे आव्हान आज जगभरातील सुरक्षा यंत्रणांसाठी एक मोठी डोकेदुखी ठरत आहे.

## शिक्षक भारती संघटनेच्या मागणीवर शिक्षण उपसंचालकांचे आश्वासन

# अतिरिक्त शिक्षकांचे मुंबईतच समायोजन



**■ठाणे :** मुंबईतील अतिरिक्त शिक्षकांचे मुंबई बाहेर समायोजन करू नये या मागणीसाठी आज शेकडो शिक्षक चर्नी रोड येथील शिक्षण उपसंचालक मुंबई कार्यालयाबाहेर सायंकाळी ४ वाजता जमले. यावेळी शिक्षक भारती संघटनेच्या शिष्टमंडळाने शिक्षण उपसंचालक संदीप संगवे यांच्या सोबत चर्चा केली. यावेळी त्यांनी अतिरिक्त शिक्षकांचे मुंबईतच प्राधान्याने समायोजन करण्याचे आश्वासन दिले असल्याचे शिक्षक भारतीचे कार्याध्यक्ष सुभाष मोरे यांनी सांगितले.

शिक्षण विभागातर्फे शिक्षकांना मुंबई बाहेर समायोजन झाल्याच्या ऑर्डर्स देण्यात आल्या आहेत. जे शिक्षक आॅर्डर स्वीकारणार नाहीत, त्यांचे पुढील महिन्याचे वेतन काढू नये असे आदेशही शिक्षण विभागाने दिले होते. त्यामुळे शिक्षकांकडून तीव्र नाराजी व्यक्त करण्यात येत होती. याचा निषेध शिक्षक भारती संघटनेने केला असून याबाबत आंदोलनाची पुढील दिशा ठरविण्यासाठी परेल येथील शिक्षक भारती कार्यालयात १ मे रोजी अतिरिक्त शिक्षकांची बैठक आयोजित केली होती. या बैठकीत समायोजनाच्या प्रश्नी शिक्षण उपसंचालकांची भेट घेण्याचा निर्णय घेण्यात आला होता. त्यानुसार शुक्रवारी शेकडो शिक्षक शिक्षण उपसंचालक मुंबई यांच्या कार्यालयाबाहेर जमले होते. समाजवादी नेते माजी आमदार कपिल पाटील आणि शिक्षक भारतीचे कार्याध्यक्ष सुभाष मोरे यांनी शिक्षण उपसंचालक संदीप संगवे यांच्या सोबत चर्चा केली. यावेळी अतिरिक्त शिक्षकांच्या विविध मागण्या मान्य करण्यात आल्या.

शिक्षण उपसंचालक कार्यालयावर झालेल्या बैठकीत माजी आमदार कपिल पाटील, शिक्षक भारती संघटनेचे कार्याध्यक्ष सुभाष सावित्री किसन मोरे, महिला आघाडीच्या राज्य अध्यक्षा संगीता पाटील, मुंबई अध्यक्षा कल्पना शेंडे, सीमा आलसकर, राधिका महांकाळ, वसंत उंबरे, संदीप पिसे, नेहा आंबेकर, भगवान बडगुजर आणि शेकडो अतिरिक्त शिक्षक उपस्थित होते.

### ...या मागण्यांचा समावेश

मुंबईतील शिक्षकांचे समायोजन जबरदस्तीने मुंबई बाहेर होणार नाही, सेवानिवृत्तीसाठी एका वर्षापेक्षा कमी कालावधी असणाऱ्या शिक्षकांचे समायोजन होणार नाही, १ जुलै २०२५ अखेरपर्यंत सेवानिवृत्त होणाऱ्या शिक्षकांची संख्या विचारात घेऊन रिक्त पदांवर शिक्षकांचे समायोजन होणार, मुंबई महानगरपालिकेच्या शाळेत कार्यरत शिक्षकांना आहे त्या शाळेतच कार्यरत राहता येईल, महानगरपालिकांच्या शाळेतील रिक्त पदांवर उरलेल्या शिक्षकांचे समायोजन करण्याचा प्रस्ताव मनपाला पाठवण्यात येईल आणि कोणत्याही शिक्षकांचे वेतन थांबवले जाणार नाही, या मागण्या यावेळी करण्यात आल्या होत्या.

## भ्रष्टाचार रोखण्यासाठी कठोर पावले उचलावीत!

# सत्र न्यायालयाची टिप्पणी

**■मुंबई :** सरकारी खात्यांमध्ये वाढलेल्या भ्रष्टाचाराला आळा घालण्यासाठी कठोर पावले उचलण्याची गरज आहे. भ्रष्टाचार करणाऱ्यांना कठोर धडा देण्याची वेळ आली आहे, अशी महत्त्वपूर्ण टिप्पणी करीत सत्र न्यायालयाने वीज कार्यालयातील एजंटला २५०० रुपयांची लाच घेतल्याप्रकरणी तीन वर्षांची सक्तमजुरी आणि ५० हजार रुपयांच्या दंडाची शिक्षा ठोठावली. ६३ वर्षीय शिवाजी घाग असे शिक्षा झालेल्या एजंटचे नाव आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक कायद्यांतर्गत गुन्ह्यांची सुनावणी करणाऱ्या विशेष एसीबी न्यायालयाचे न्यायाधीश एस. ई. बांगर यांनी आरोपी घाग याला दोषी ठरवले. खटला सुरू असताना घाग जामिनावर बाहेर होता. न्यायालयाने त्याला भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यांतर्गत दोषी ठरवले. विशेष न्यायाधीशांनी घागला दोषी ठरवताना सर्वोच्च न्यायालयाच्या एका निर्णयाचा उल्लेख केला. त्या निकालानुसार खासगी व्यक्तींना भ्रष्टाचार कायद्याअंतर्गत शिक्षा करण्याची परवानगी आहे.

चेंबूर येथील वीज कार्यालयात एजंट म्हणून काम करणाऱ्या घागने एका व्यक्तीला वायरमनचा परवाना मिळवून देण्यासाठी पैसे मागितले होते. २०१५ मध्ये ही घटना घडली होती. घाग हा सरकारी अधिकारी नव्हता. असे असतानाही त्याने एजंट म्हणून काम केले आणि एका व्यक्तीकडून ५००० रुपये मागितले. परवाना मिळण्यापूर्वी २५०० रुपये आणि परवाना मिळाल्यानंतर २५०० रुपये अशी पैशांची मागणी करण्यात आली होती. वास्तविक परवान्यासाठी अधिकृत शुल्क फक्त २०० रुपये होते.



# बुलेट ट्रेनच्या पहिल्या स्थानकाचे काम वेगात!

## बीकेसी स्थानकाचे ७६ टक्के खोदकाम पूर्ण : अश्विनी वैष्णव



**■मुंबई :** बीकेसी (बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स) येथे उभारण्यात येणाऱ्या बुलेट ट्रेनच्या मुंबईतील पहिल्या स्थानकाचे काम वेगाने सुरू असून स्थानकाच्या ७६ टक्के खोदकाम पूर्ण झाले असल्याची माहिती रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी शनिवारी येथे दिली. वैष्णव यांनी मुंबईतील बीकेसी येथील बांधकामाधीन भुयारी स्थानकाला भेट देऊन तेथील प्रत्यक्ष प्रगतीची पाहणी केली. यावेळी त्यांच्यासोबत नॅशनल हायस्पीड रेल कॉर्पोरेशन लिमिटेडचे अधिकारी, तसेच मध्य रेल्वे आणि पश्चिम रेल्वेचे प्रतिनिधीही उपस्थित होते.

५०० किमीहून अधिक लांबीच्या मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गेल्या आठवड्यात सांगितले होते की, महत्त्वाकांक्षी बुलेट ट्रेन प्रकल्प २०२८ पर्यंत कार्यान्वित होईल. वैष्णव म्हणाले की, बी३ बेसमेंटचा तळ आणि स्थानकाच्या भिंतींना मजबुती देण्याचे काम पूर्ण झाले आहे.

बीकेसी येथील बुलेट ट्रेनच्या उगम स्थानकाचे काम वेगात सुरू आहे. स्थानकाच्या भिंतींचे काम सुरू झाले असून बोगद्याचे कामही जलद गतीने सुरू आहे, असेही ते म्हणाले. त्यांनी सांगितले की, शिळफाट्याच्या (डोंबिवली) पलीकडील बोगद्याच्या भागानंतर महाराष्ट्रातील सर्व कामे भू-संपादन झाल्यानंतर जलद गतीने सुरू आहेत.

बीकेसी स्थानकावर एक बहुमजली रचना उभारण्यात येणार आहे. बी१ ते बी३ स्तरांवर ऑपरेशनल क्षेत्र असतील. बी३ स्तर हा ट्रेन पार्किंगसाठी असेल, बी२ वर ऑपरेशनल फंक्शन्स असतील आणि बी१ व ग्राउंड लेव्हलवर प्रवाशांसाठी व्यवस्था असेल. बुलेट ट्रेनमधील हे जागतिक दर्जाचे स्थानक उभारण्याचे काम सुरू असल्याचेही वैष्णव यांनी सांगितले.

### एकूण खर्च १.०८ कोटी

मुंबई-अहमदाबाद हाय-स्पीड रेल कॉरिडॉर प्रकल्पाचा एकूण खर्च १.०८ लाख कोटी रुपये आहे. भागभांडवलाच्या व्यवस्थेनुसार, भारत सरकार १० हजार कोटी रुपये योगदान देणार असून गुजरात आणि महाराष्ट्र राज्ये प्रत्येकी ५ हजार कोटी रुपये देईल. तर उर्वरित निधी जपानकडून ०.१ टक्के व्याजदराने घेतलेल्या कर्जातून दिला जाईल.

# नागपूर जवळील समृद्धी महामार्गावर दरोडेखोरांची दहशत... डॉक्टर दाम्पत्याची गाडी अडवून ११ लाखांचा ऐवज लुटला




**■मुंबई :** मुंबई आणि नागपूरला जवळ आणणाऱ्या समृद्धी महामार्गावरुन जाणाऱ्या वाहनधाराकांची संख्या वाढत आहे. परंतु या महामार्गावर लूटमारीच्या घटनाही वाढत आहेत.

छत्रपती संभाजीनगरजवळ करमाड पोलीस ठाण्याच्या हद्दीपासून दोन किलोमीटर दूर अंतरावर गाडी अडवून डॉक्टर दांपत्यास लुटण्यात आले आहे. पालघर जिल्ह्यातील बोईसर येथे वैद्यकीय व्यवसाय करणाऱ्या डॉक्टर दाम्पत्याकडून ११ लाख १२ हजार रुपयांचा ऐवज दरोडेखोरांनी लुटून नेला.

सध्या उन्हाचा कडाका वाढला आहे. यामुळे दिवसाप्रवास करण्यापेक्षा रात्रीचा प्रवास करायला अनेक जण प्राधान्य देत आहेत. त्याचा फायदा दरोडेखोर घेत आहेत. समृद्धीवरुन जाणाऱ्या वाहनधारकांची लूट दरोडेखोर करत आहे. २ मे रोजी रात्री दहा ते साडेदहाच्या सुमारास डॉक्टर चैताली शिंगणे यांचा कारचा पाठलाग एक कार करत होती. पाठलाग करणाऱ्या या गाडीने डॉक्टर शिंगणे यांच्या कारसमोर गाडी लावली. त्यातून चार जण उतरले. त्यांनी डॉक्टरांच्या कारची चावी काढून घेतली. डॉक्टर चैताली शिंगणे आणि त्यांचे पती श्रावण शिंगणे यांना मारहाण करण्यास सुरुवात केली. त्याचा जाब विचारताच जीवे मारण्याची धमकी दिली, अशी तक्रार डॉक्टर चैताली श्रावण शिंगणे यांनी चिकलठाणा पोलीस ३ मे रोजी दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे. दरोडेखोरांनी १ लाख रुपयांचे दीड तोळ्याचे सोन्याचे मंगळसूत्र, 3 लाख रुपयांची चार तोळ्यांची सोन्याची पोत, दीड लाख रुपयांचा लक्ष्मी हार, दीड लाख रुपयांची लहान पोत, ४ लाखांची मोठी पोत, १२ हजारांचा मोबाईल, असा सुमारे ११ लाख १२ हजार रुपयांचा ऐवज दरोडेखोरांनी लुटून नेला. समृद्धीवर रात्री पडलेल्या या दरोड्यांना आता प्रवास करणाऱ्यामध्ये भीतीच वातावरण आहे.

समृद्धी महामार्ग नागपूर ते इगतपुरीपर्यंत सुरु झाला आहे. इगतपुरी ते आमण हा ७६ किलोमीटरचा टप्पा अजून सुरु झाला नाही. एकूण ७०१ किलोमीटर लांबीच्या या महामार्गातील ६२५ किलोमीटरचा महामार्ग सुरु झाला आहे.

समृद्धी महामार्गाचा शेवटच्या टप्प्याचे उद्घाटन १ मे रोजी होणार होते. परंतु पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची वेळ न मिळाल्याने ते लांबीवर पडले.

# मासिक पाळीत स्वयंपाक केल्याने छळ

## जळगावमध्ये सूनेने उचललं भयंकर पाऊल, सासू अन् नणंदेने...

**■मुंबई :** जळगाव येथे एक धक्कादायक प्रकार समोर आला आहे. तालुक्यातील किनोद येथील विवाहितेने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना समोर आली आहे. गायत्री कोळी २६ असं विवाहितेचे नाव आहे. दरम्यान, गायत्रीने आत्महत्या केली नसून विवाहितेची सासू आणि नणंद यांनी गळा दाबून हत्या केल्याचा आरोप विवाहितेच्या माहेरच्या मंडळींनी केला आहे.

गायत्रीच्या मृत्यूनंतर परिसरात एकच खळबळ उडाली आहे. गायत्रीला मासिक पाळी आली होती. या काळात तिने स्वयंपाक केला होता तो स्वयंपाक तिच्या सासू आणि इतरांना खाण्यास नकार दिला होता. यावरून किरकोळ वाद झाला होता. मात्र पुढे हा वाद विकोपाला गेला. हा वाद विकोपाला गेल्याने सासू आणि नणंद यांनी तिला मारझोड केली आणि गळा दाबून खून केला आणि नंतर आत्महत्या केल्याचा बनाव करत गळ्यात साडी बांधून तिला लटकवून दिले. असा आरोप नातेवाईकांनी केला आहे

सासरच्या दोषींवर गुन्हा होईपर्यंत मृतदेह ताब्यात घेणार नाही असा पावित्र मयत गायत्रीच्या माहेरच्या कुटुंबियांनी घेतला आहे. या घटनेचा पोलिस करत आहेत.

### तरुणाची धारदार शस्त्राने हत्या

नागपुरातील भांडेवाडी परिसरात काल रात्री एका तरुणाची धारदार शस्त्राने हत्या करण्यात आल्याचे उघड झाले. सतीश मेश्राम (३१ वर्ष) असे हत्या झालेल्या तरुणाचे नाव असून तो बांधकाम साइटवर काम करायचा. दोन दिवसांपूर्वी कामावर गेलेला सतीश घरी न परतल्यामुळे कुटुंबीयांनी त्याचा शोध सुरू केला होता. त्याच प्रयत्नात पारडी पोलीस स्टेशनमध्ये तो मिसिंग असल्याची तक्रार ही देण्यात आली होती. काल रात्री भांडेवाडी रेल्वे स्थानकावरील बांधकाम सुरू असलेल्या प्लॅटफॉर्म जवळ काही लोकांना सतीशच्या मृतदेह आढळून आला. तेव्हा पोलिसांना घटनेची माहिती देण्यात आली. सतीश ची हत्या धारदार शस्त्राने करण्यात आली असून या प्रकरणी पोलिसांनी तीन संशयीतांना ताब्यात घेतले आहे.

## तरुणीला मेसेज करून जंगलात लपला

# पोलिसांनी आदिवासी वेशभूषा करून नराधमाला पकडला



**■नवी मुंबई :** बदलापूर पूर्वेतील एका २१ वर्षीय तरुणीला सतत मेसेज करून त्रास देणाऱ्या आणि दोन वर्षांपूर्वी तिचा विनयभंग करणाऱ्या एका आरोपीला बदलापूर पोलिसांनी अटक केली आहे. गणेश अल्पतराव असे या आरोपीचे नाव असून तो मुरबाडमधील रहिवाशी आहे. बदलापूर पोलिसांनी त्याला पकडण्यासाठी एक अनोखी युक्ती केली आणि तो अलगद पोलिसांच्या तावडीत सापडला.

### नेमकं प्रकरण काय?

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पीडित तरुणी बदलापूर पूर्वेत राहते. दोन वर्षांपूर्वी गणेशने तिचा विनयभंग केला होता. याप्रकरणी त्याच्यावर कारवाई झाली होती. मात्र, त्यानंतरही गणेशने तरुणीचा पिच्छा सोडला नव्हता. तो तिला वारंवार मेसेज करून धमक्या देत होता. ह्नतुला घ्यायला मी इनोव्हा गाडी पाठवतो, त्यात बसून माझ्याकडे ये, अन्यथा ओम्नी गाडी पाठवावी लागेल,ह्व अशा आशयाचे धमकीचे मेसेज तो तिला पाठवत होता. या त्रासाला कंटाळून तरुणीने पुन्हा एकदा बदलापूर पूर्व पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.

या तक्रारीनंतर बदलापूर पोलिसांनी त्वरित यावर कारवाई करण्यास सुरुवात केली. बदलापूर पोलिसांनी गणेशचा ठिकठिकाणी शोध घेतला. मात्र तो फरार झाला होता. पोलीस त्याचा कसून शोध घेत असल्याचे समजताच गणेश मुरबाडच्या जंगलात फरार झाला. त्यामुळे वरिष्ठ पोलीस निरीक्षक किरण बालवडकर आणि पोलीस निरीक्षक राजेश गज्जल यांनी त्याला पकडण्यासाठी खास योजना आखली.

### पोलिसांनी आदिवासी वेशभूषा केली अन्...

यावेळी पोलिसांनी आदिवासी वेशभूषा केली. ते जंगलात गेले. त्यांनी गणेशला शोधून काढले. सुरुवातीला त्याच्याशी बोलण्यास सुरुवात केली. तोच गणेश अल्पतराव असल्याची खात्री झाल्यावर पोलिसांनी तात्काळ त्याच्यावर झडप घालून त्याला अटक केली.

### पीडित तरुणीला मोठा दिलासा

पोलीस उपनिरीक्षक प्रशांत थिटे, अरक राजाराम कुकले, हवालदार कृष्णा पाटोळे, विजय गिरीगोसावी आणि कॉन्स्टेबल महादेव पिसे यांच्या पथकाने ही यशस्वी कारवाई केली. या कारवाईमुळे पीडित तरुणीला मोठा दिलासा मिळाला आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४०००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com